“नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास”

दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३

**WEB SITE : http://www.nkgsbsangh.org**

**E-MAIL : nkgsbs@gmail.com**

कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।। सा विद्या या विमुक्तये।।

मूल्य रु. ५

क्रमांक ३ वर्ष : ४० ऑक्टोबर-डिसेंबर २०१८

**BOOK POST**

Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

# दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. संघ आणि
# दि नॉथ कॅनरा जी. एस. बी. इंडस्ट्रीयल अँड एज्यु. सोसायटी
## वार्षिक स्नेहसंमेलन - २०१८

## निमंत्रण पत्रिका

ज्ञातीतील सर्व बंधुभगिनींना नम्र विनंती आहे की आपण सर्वांनी ज्ञातीच्या येत्या वार्षिक स्नेहसंमेलनास उपस्थित राहून शोभा आणावी व कार्यक्रम यशस्वी करण्यास साहाय्य करावे.

प्रमुख पाहुणे : श्री. अरुण भास्कर कसबेकर, दानशूर हितचिंतक
स्थळ : डॉ. अंटोनिओ डिसिल्व्हा ट्रस्ट हॉल, कबुतरखाना, दादर
दिनांक : रविवार २५ नोव्हेंबर २०१८ सायं. ४.१५ वाजता

## कार्यक्रम

- स्वागत गीत
- संघ व एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षांची भाषणे
- प्रमुख पाहुण्यांचे मनोगत
- विशेष सत्कार : डॉ. सुहास पांडुरंग वाघ
  एज्युकेशन सोसायटीचे सन्माननीय सभासद केल्याबद्दल
  (तपशील : पृष्ठ ५)

◈◈◈ मध्यंतर ◈◈◈

- विवाहाची सुवर्णजयंती ओलांडणाऱ्या जोडप्यांचा व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा सत्कार.
- एज्यु. सोसायटीतर्फे गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना सौ. मंगला कसबेकर यांच्या हस्ते बक्षिसे.

स्नेह संमेलनासाठी वेगळे निमंत्रण पाठविले जाणार नाही.
याची कृपया नोंद घ्यावी.

**मारुती वि. दळवी**
कार्याध्यक्ष – संघ

**देवदास अ. नाडकर्णी**
कार्याध्यक्ष – एज्युकेशन सोसायटी

# संपादकीय

## स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे श्री. अरुण भास्कर कसबेकर

२५ नोव्हेंबर रोजी ज्ञातीचे वार्षिक स्नेह संमेलन दादर येथे भरणार आहे. त्याची निमंत्रण पत्रिका पुढील पृष्टावर छापलेली आहे. या स्नेह संमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून श्री. अरुण भास्कर कसबेकर यांना निमंत्रित करण्यांत आले आहे. वाचकांना श्री. कसबेकर यांची ओळख करुन देण्याची गरज नाही. ते वेगवेगळया प्रसंगी संघाच्या वृध्द सेवानिधीसाठी उल्लेखनीय देणग्या देत असतात व तसा उल्लेख त्या त्यावेळी मुखपत्रिकेत केला गेला आहे. त्यांनी गेल्या बारा वर्षांत २१ प्रसंगी एकूण ३४ लाख ४० हजार रुपयांच्या देणग्या दिल्या आहेत. बहुतेक देणगीदार आपल्या आप्तेष्टांच्या स्मृतीप्रीत्यर्थ देणग्या देतात पण श्री. कसबेकर यांची खासियत म्हणजे ते आप्तेष्टांच्या स्मृतीप्रीत्यर्थ देणग्या देतात एवढेच नव्हे तर केवळ कृतज्ञतेच्या भावनेने माणुसकीच्या नजरेतून इतरांच्या स्मृतीप्रीत्यर्थही देणग्या देतात, मग ते हिंदू हायस्कूलचे ऋषीतुल्य शिक्षक असोत वा टॅक्सीवाला सरदारजी असो.

श्री. कसबेकर यांचे मनोरंजनात्मक व अंतर्मुख करणारे लेख वेळोवेळी मुखपत्रिकेत प्रकाशीत होतात. त्याबद्दलच्या सकारात्मक प्रतिक्रिया त्यांच्यापर्यंतच नव्हे तर आमच्यापर्यंतही पोचतात. त्यामुळेही त्यांची ओळख बऱ्याच जणांना झालेली आहे. दोन वर्षांपूर्वी त्यांना संघाने सन्माननीय सभासद म्हणून स्वीकृत करुन घेतले होते व स्नेहसंमेलनात त्यांचा जाहीर सत्कार करण्यांत आला होता. त्याप्रसंगी त्यांच्या कार्याचा विशेषत: त्यांनी गरजूंना वेळोवेळी त्यावेळी दुर्मीळ असलेले स्टील मिळवून साहाय्य केल्याचा उल्लेख केला होता.

स्नेह संमेलनाच्या प्रसंगी हुशार विद्यार्थ्यांसाठी बक्षीस वितरण समारंभही संपन्न होतो. प्रथेप्रमाणे प्रमुख पाहुणे यांच्या पत्नीमार्फत हे वितरण होते. त्यानुसार यंदाचे बक्षिस वितरण श्री. कसबेकर यांच्या सुविद्य पत्नी सौ. मंगला (प्रभा) यांच्या हस्ते होणार आहे. मंगलाताईंना अंध व्यक्तींविषयी विशेष कणव आहे. अंधांसाठी कार्य करणाऱ्या सेवाभावी संस्थांना त्या सढळ हस्ते आर्थिक साहाय्य देतातच, त्याशिवाय कित्येक अंध विद्यार्थ्यांना त्यांनी वैयक्तिक पातळीवर मदत केलेली आहे. तब्बल २० वर्षे त्यांच्यासाठी पुस्तके वाचून दाखविणे, धडे स्वत:च्या आवाजात रेकॉर्ड करणे, अंधाना टेपरेकॉर्डर घेऊन देणे, अभ्यासाची उजळणी घेणे, परीक्षेच्या कक्षांपर्यंत त्यांना घेऊन जाणे, हॉलमध्ये बसून त्यांनी सांगितल्याप्रमाणे उत्तरपत्रिका लिहिणे अशा प्रकारची विधायक कामेही मंगलाताईंनी केली आहेत. एका विद्यार्थ्याला तर त्यांनी पी. एच. डी. होईपर्यत मदत केली होती. त्याशिवाय किमान १० जणांच्या डोळयाच्या शस्त्रक्रियांच्या खर्चाचा भार त्यांनी उचलला आहे.

जागतिक पातळीवर प्रख्यात असलेला फोटोग्राफर व 'नीरजा' या चित्रपटासाठी राष्ट्रीय पुरस्कार मिळाला त्या चित्रपटाचा निर्माता अतुल कसबेकर हा कसबेकर दांपत्याचा सुपुत्र होय.

१.१०.२०१८

द.ना.नाडकर्णी



संघाच्या प्रोत्साहनाने आणि ठाणे मंच आयोजित

## तिसरा वधूवर परिचय मेळावा



दिनांक : रविवार १८ नोव्हेंबर २०१८

वेळ : सकाळी ९.३० ते १.००

स्थळ : तेंडुलकर मंगल कार्यालय, मोगल लेन, माहीम

नोंदणी शुल्क : रु. ४००

### विशेष सूचना

१. हा मेळावा फक्त गौ. सा. ब्राह्मण व सारस्वत उमेदवारांसाठी आहे.

२. पूर्व तयारीसाठी संबंधितांनी खालील पदाधिकाऱ्यांकडे १४ नोव्हेंबर पर्यंत आपला संपर्क नंबर देऊन नोंदणी करावी.

३. नोंदणी शुल्क आपल्या बँकेच्या खाते क्र. १८१६ नौपाडा - ठाणे या शाखेत भरण्याची सोय.

### संपर्क

सुरेश पालेकर ९९६९४५५३७०

गिरीश रेगे ९९२२१६८७२५

**Visit our website :** www.nkgsbmatrimony.com

## ठाणे मंच आयोजित 'सुरभी'

(विविध गाण्यांची धुंद मैफल)

'सुरभी' ही विविध गाण्यांची मैफल ठाण्यांत आयोजित केली आहे सर्व ज्ञातिबांधवांनी हेच निमंत्रण समजून कार्यक्रमास हजर राहावे.

दिनांक : शनिवार १ डिसेंबर २०१८

समय : संध्याकाळी ४.३० ते ७.३०

स्थळ : सहयोग मंदीर हॉल, विष्णूनगर , नौपाडा, ठाणे (प).

- ज्ञातींतील उत्तम प्रतीचे गाणे म्हणणाऱ्या नवोदित व तरुण / तरुणींना आपली कला सादर करण्याची उत्तम संधी .
- पुणे व मुंबई येथे हा कार्यक्रम केला जाईल. तथापी आपले आर्थिक साहाय्य प्रार्थनीय.

संपर्क : सुरेश पालेकर - ९९६९४५५३७०

# प्रकाशझोत

## सुप्रसिध्द ENT तज्ज्ञ डॉ. सुहास वाघ हे एज्युकेशन सोसायटीचे सन्माननीय सभासद म्हणून स्वीकृत

एज्युकेशन सोसायटीच्या कार्यावळीनुसार शैक्षणिक क्षेत्रांत ज्यांचे योगदान लक्षणीय असेल अशा व्यक्तीचा गौरव म्हणून एज्युकेशन सोसायटीचे 'सन्माननीय सभासद' म्हणून स्वीकृत करण्याची तरतूद आहे. त्यानुसार १ सप्टेंबर रोजी एज्युकेशन सोसायटीच्या वार्षिक सर्वसाधारणसभेंत सुप्रसिध्द ENT तज्ज्ञ डॉ. सुहास पांडुरंग वाघ यांना त्यांच्या विषयांतील शैक्षणिक योगदानाबद्दल 'सन्माननीय सभासद' म्हणून स्वीकृत करण्यांत आले. पृष्ठ दोन वर दिलेल्या निमंत्रण पत्रिकेनुसार २५ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या ज्ञातीच्या वार्षिक स्नेहसंमेलनांत प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते त्यांचा जाहीर सत्कार करण्यांत येईल.

डॉ. वाघ यांना २०१४ साली स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यांत आले होते. त्यावेळच्या मुखपत्रिकेच्या अंकात त्यांचा परिचय करुन दिला होता. त्यांतील फक्त अध्यापनक्षेत्र विषयाच्या त्यांच्या योगदानाचा पुनरुच्चार केल्यास संयुक्तीक होईल. के.ई.एम्. हॉस्पिटलशी संलग्न असलेल्या जी.एस. मेडिकल कॉलेज येथे ENT विभागांत त्यांनी ऑनररी प्रोफेसर म्हणून अनेक वर्षे विद्यार्थ्यांना शिकविले. त्याशिवाय कूपर हॉस्पिटलमध्ये त्याच विषयाचे ऑनररी विभागप्रमुख म्हणून २३ वर्षे सेवा केली व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले. गेल्या वर्षी ENT सर्जन्स ऑफ इंडिया या संस्थेच्या मुंबई शाखेतर्फे २०१७ सालचा 'जीवन गौरव' हा मानाचा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यांत आला होता.

## डॉ. महेश संजगिरी यांना त्यांच्या उत्कृष्ट शोध निबंधाबद्दल अमेरिकेंतील रसायनशास्त्र निगडीत संस्थेतर्फे आजन्म सभासदत्व बहाल

अमेरिकेंतील अटलांटा येथे १८ व १९ जुलै २०१८ रोजी भरलेल्या २४ व्या Global Organic and Inorganic Chemistry Conference 2018 मध्ये त्या विषयांतील तज्ज्ञ डॉ. महेश नारायण संजगिरी यांनी दोन संशोधन निबंध सादर केले. वैद्यकीय रसायनशास्त्र विभागा अंतर्गत त्यांनी केलेले संशोधन असाध्य अशा कॅन्सर व एड्स या व्याधींचा मुकाबला करण्यासंबंधात होते. आपल्या संशोधनांत आपलेच सारस्वत बांधव डॉ. राजीव साखरदांडे (एल्डर फार्मा) डॉ. अशोक आमोणकर (टाटा कॅन्सर सेल्युलर केमाथेरपी लॅब) व डॉ. शशिकांत पालेकर (मुंबई विद्यापीठाची इंस्ट्रुमेंट प्रयोगशाळा) यांचे त्यांना सहकार्य लाभले. या संशोधनासाठी त्यांनी साधारण १५ वर्षे परिश्रम घेतले. जगभरांतील आलेल्या शोध निबंधापैकी सर्वोत्तम सादरीकरणासाठी डॉ.

संजगिरी यांची निवड झाली व त्यांना आजन्म सभासदत्व देण्यांत आले. जंगलातील वाघांच्या स्वत:च्या वास्तव्याच्या हद्दीच्या मर्यादा लघ्वीद्वारे कशा ठरविल्या जातात त्याचे विश्लेषणात्मक संशोधनही त्यांनी केले आहे. वाघवाघिणींच्या रसायनशास्त्राचे प्रथमच संशोधन केल्याबद्दल सर्व उपस्थित प्रेक्षकांनी त्यांचे उत्स्फूर्तपणे कौतुक केले.

रसायनशास्त्रांतील भीष्माचार्य म्हणून ज्यांची ओळख आहे ते आपल्याचा ज्ञातीतील प्रा. वामन नाडकर्णी यांच्याच मार्गदर्शनाखाली डॉ. संजगिरी यांनी त्याच विषयांत सेंट झेवीयर्स महाविद्यालयांतून मुंबई विद्यापीठाची पी. एच.डी. पदवी प्राप्त केली आहे.

### डॉ. गुरुदत्त वर्टी प्रतिष्ठेच्या पदव्युत्तर MCH प्रवेश परीक्षेंत उत्तीर्ण

दादर येथे राहणारे डॉ. परेश प्रमोद वर्टी हे Gastro Intestinal विषयांतील तज्ज्ञ सर्जन असून ते लीलावती हॉस्पिटल व गुरुनानक हॉस्पिटल यांच्याशी निगडीत आहेत. त्यांच्या पत्नी डॉ. संगीता या ENT सर्जन असून त्या माहीम येथील हिन्दुजा हॉस्पिटलमध्ये काम करतात. त्यांचा मुलगा गुरुदत्त हा स्वत: जनरल सर्जरीमधला MS आहे. ऑल इंडिया NEET पदव्युत्तर सुपरस्पेशॅलिटी MCH Gastro Intestinal Surgery या अति प्रगल्भ विषयाच्या प्रवेश परीक्षेंत तो उत्तीर्ण झाला आहे. उभ्या भारतातून हजारो विद्यार्थी या परीक्षेत बसतात व जागा आहेत फक्त चाळीस. या चाळीसमध्ये गुरुदत्तची निवड झाली हे कौतुकास्पद होय. हा तीन वर्षाचा रेसीडेन्सी कोर्स असून नारायण मेडीकल अँड हॉस्पिटल या आंध्र प्रदेशातील नेलोर येथे त्यांने प्रवेश घेतला आहे. विशेष नमूद करायचे म्हणजे प्रगत समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्रांत हा विषय कुठेच शिकविला जात नाही.

### आपल्या बँकेच्या १०१ व्या स्थापनादिनीं आद्य संस्थापक शेठ शांताराम कुलकर्णी यांच्या पुतळयाचे अनावरण

२६ सप्टेंबर २०१८ हा आपल्या बँकेचा १०१ वा स्थापनादिन. त्यादिवशी बँकेचे आद्य संस्थापक शेठ शांताराम कुलकर्णी यांच्या पुतळयाचे अनावरण गिरगांव येथील मुख्य कार्यालयाच्या आवारात बँकेचे अध्यक्ष श्री. किशोर कुलकर्णी यांनी केले. हा पुतळा चौपाटीमधील सुप्रसिध्द वाघ कुटुंबीयांपैकी श्री. विनय ब्रह्मेश वाघ यांनी तयार केला होता. हा पुतळा पंचधातूमध्ये असून त्याचा चौथरा ग्रॅनायटचा आहे. विशेष नमूद करावयाचे म्हणजे आपल्या ज्ञातीतील एक ऐतिहासिक व्यक्ती म्हणजे आपल्या एज्युकेशन सोसायटीचे पहिले कार्याध्यक्ष श्री. सदाशिव शंकर वाघ यांचा पुतळा हा शिल्पकार विनायकराव वाघ यांच्या कारकीर्दीतील पहिला पुतळा. तो पुतळा सध्या सदाशिवगड हायस्कूल येथे बसविलेला आहे. आपल्या ज्ञातीतील दुसरी ऐतिहासिक व्यक्ती म्हणजे शेठ शांताराम कुलकर्णी यांचा सदर पुतळा बनविणारे विनय वाघ हे विनायकरावांचेच नातू हा एक सुखद योगायोग

म्हणावा लागेल. या पुतळयाच्या अनावरणप्रसंगी बँकेच्या इतर पदाधिकाऱ्यांशिवाय शेठ शांताराम यांचे नातू दुर्गादास (उदय) हे सुध्दां उपस्थित होते.

## विनय वाघ यांनी बनविलेल्या जैनगुरुंच्या पुतळयाचे शिकागो येथे अनावरण

११ते २७ सप्टेंबर १८९३ या कालावधींत शिकागो येथे पहिली सर्व धर्म परिषद भरविण्यांत आली होती. त्यावेळी हिंदू धर्माचे प्रतिनिधी म्हणून स्वामी विवेकानंद यांचे व्याख्यान संस्मरणीय ठरले. त्या परिषदेला सतार मंगेशमामा तेलंग यांचे बंधू श्री. पुरुषोत्तमराव तेलंगही उपस्थित होते. विलायतेत जाणारे ते पहिले ज्ञातिबांधव. ते नखाने तसबीर काढण्यांत तरबेज होते. वरील शिकागो धर्मपरिषदेमध्ये जैन धर्माचे प्रतिनिधीत्व वीरचंद राघवजी गांधी यांनी केले होते. त्याच शिकागो शहरांत वीरचंद गांधी यांचे स्मारक शिल्प आहे. या शिल्पाच्या बाजूलाच अलीकडेच चार महिन्यापूर्वी जैन समाजाचे विद्यमान ९० वर्षीय गुरु चित्रभानू यांच्या संगमरवरी पुतळयाचे एका मोठया सोहळयात अनावरण झाले. हा पुतळाही सतार मंगेशमामांचे पणतू विनय वाघ यांनी बनविलेला आहे.

## एज्युकेशन सोसायटीची नवी कार्यकारिणी

१सप्टेंबर रोजी एज्युकेशन सोसायटीच्या वार्षिक सर्वसाधारणसभेत नव्या कार्यकारिणी सभसदांची बिनविरोध निवड झाली. त्यानंतर भरलेल्या कार्यकारिणीच्या पहिल्या सभेत २०१८-२१ या तीन वर्षाच्या कालावधीसाठी खालील पदाधिकाऱ्यांची निवड झाली.

**कार्याध्यक्ष** : देवदास नाडकर्णी **उपाध्यक्ष** : डॉ.विवेक कुलकर्णी

**कार्यवाह** : मंगेश पालेकर व गीता संजगिरी **खजिनदार** : गणपती नाडकर्णी व अरविंद भट

**सभासद** : राजीव गायतोंडे, प्रदीप देसाई, प्राची देसाई, अमेय नाडकर्णी (स्वीकृत)

## विद्यार्थ्यांसाठीची नियोजित वक्तृत्व स्पर्धा अल्पप्रसादामुळे रहित

पूर्वी बालकांसाठी प्रतिवर्षी संस्कृत पाठांतर स्पर्धा भरविण्यांत येत असे. इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणामुळे दिवसेंदिवस या स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या रोडावत गेली. सरतेशेवटी गेल्यावर्षी ही स्पर्धा रहित करणे भाग पडले. पर्याय म्हणून यंदा वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यांत आले व त्यानुसार मुखपत्रिकेच्या गेल्या अंकांत त्याबद्दल निवेदनही देण्यांत आले होते. याही नियोजित स्पर्धेला उत्साहवर्धक प्रतिसाद मिळाला नाही म्हणून ही स्पर्धापण नाईलाजाने रद्द करावी लागली.

## नवरात्रोत्सवाच्या शुभमुहूर्तावर
## श्री शांतादुर्गेच्या कृपाछायेत
## सुखसमृद्धीतील वास्तुप्रवेश म्हणजे
# आनंदासोबत दीर्घायुष्य
# बोनस!




श्री शांतादुर्गेच्या आशिर्वादाने, मंगेशाच्या कृपादृष्टीने पवित्र झालेल्या गोव्याच्या भूमीत वसलेलं 'सुखसमृद्धी' संकूल अगदी नावाप्रमाणेच यथायोग्य. मनाला भुरळ घालणारा निसर्ग, खळाळणारं पाणी, मुक्त वाऱ्यासोबत चाललेल्या झाडांच्या गुजगोष्टी सारं काही सुखसमृद्धीतील वास्तव्य मन:शांति देणारं, प्रसन्न करणारं आहे. अशा या मांगल्याचं वरदान लाभलेल्या संकूलात आजच आपली पवित्र वास्तू निश्चित करा आणि दीर्घायुषी व्हा!

अप्रतिम निसर्गाने नटलेलं **सुखसमृद्धी**

मंगेशाच्या देवळापासून २ मिनिटांच्या अंतरावर **मंगेशी, फोंडा- गोवा**

देखणा निसर्ग | प्रदुषणमुक्त हवा | उत्कृष्ट बांधकाम | मुबलक पाणीपुरवठा

**GOA RERA NO: PRGO05180314**

a Project by: **कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी**

**मुंबई ऑफिस:** 401, चौथा मजला, जोश आर्केड, युनायटेड इंक कंपनीच्या बाजूला, सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057.
फॅक्स:2683 3872. ई-मेल: kunalconstruction@vsnl.net, kunalconstructiongoa@yahoo.in वेब: www.kccgoa.in
उमेश केरकर ☎:**2683 3841/47/ 72.** 📱:**98336 36451**
**गोवा ऑफिस:** टी- १, रॉयल हाऊस, काझीवाडो, फोंडा- गोवा. मोबा: **98209 33352, 98206 33321**
**गोवा साईट:** 95/1, वेलिंग, मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा

## प्रतिक्रिया

### हिंदूंची जागतिक प्रार्थना

मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात श्रीमती वंदना नाडकर्णी ह्यांनी हिंदूंची जागतिक प्रार्थना म्हणून गायत्री मंत्राची निवड संयुक्तीक होईल असे मत मांडले आहे.

माझ्या मते मंत्र आणि प्रार्थना ह्या दोन्हीत मूलभूत फरक आहे. मंत्र हा आत्मोन्नतीसाठी असतो व तो व्यक्ती सापेक्ष असतो. मंत्रामध्ये शाब्दिक अर्थापेक्षा ध्वनीला जास्त महत्व असते, म्हणून मंत्रोच्चार हा शास्त्रशुध्दच असावा लागतो. त्याचे उच्चारण विशिष्ट पध्दतीनेच केले पाहिजे. प्रत्येकाला एकच मंत्र योग्य असतो असे नाही, म्हणून कुठल्याही मंत्राला जागतिक प्रार्थना म्हणून संबोधणे संयुक्तीक होणार नाही.

प्रार्थना ही भावप्रधान असते. प्रार्थनेत शब्दाला अर्थ असतो तशीच कामनाही असते. हिंदू धर्मीयांच्या प्रत्येक पूजाविधीमध्ये अनेक प्रार्थना आहेत. त्यातल्या काही वैयक्तिक स्वरुपाच्या तर काही सामाजिक वा वैश्विक स्वरुपाच्या आहेत.

हिंदू धर्म हा उदात्त, विशाल व सर्वसमावेशक,अशा तत्त्वावर आधारित आहे 'वसुधैव कुटुंबकम्' अशी हिंदू धर्माची धारणा आहे.

सर्वसाधारणपणे प्रत्येक पूजाविधीच्या शेवटी

"सर्वे भवन्तु सुखिन:। सर्वे सन्तु निरामया:।<br>
सर्वे भद्राणि पश्यन्तु। मा कश्चिद् दु:ख माप्नुयात् ।।<br>
ॐ शान्ति: शान्ति: शान्ति: ।।" ही प्रार्थना म्हणण्याची पध्दत आहे.

ह्या प्रार्थनेत मी, माझे कुटुंब, फक्त भारतीयच नव्हे तर विश्वातील सर्व प्राणीमात्र सुखी व आरोग्य संपन्न होवो अशी कामना केली आहे. ही प्रार्थना सोपी, सुटसुटीत व अर्थपूर्ण आहे व ती वैयक्तिक रीत्या किंवा सामुदायीकपणे सुध्दा म्हणता येते. म्हणून ही प्रार्थना जागतिक प्रार्थना होऊ शकते.

**सौ. संगीता शिरीष वाघ, दहिसर**<br>
**(९८९२६८६१०३)**

**YOGESH D. WAGLE**

**Mg partner : YRGS GLOBAL LLP**

| | | |
|---|---|---|
| • HEALTH INSURANCE | •GENERAL INSURANCE | • LIFE INSURANCE |
| • PERSONAL LOAN | • CAR LOAN | • HOUSING LOAN |
| • BUSINESS LOAN | • MORTGAGE LOAN | |

**WE OPERATE PAN - INDIA**

**Mob. : 9901521411 / 9590057170**

Email : yogesh.yrgsgroup@gmail.com

## 'सर्वप्रथम सेवा' याची व्याप्ती

मुंबईमध्ये हजारो हौसिंग सोसायट्या, टॉवर्स, इंडस्ट्रीयल इस्टेट्स वगैरे आहेत. त्यांचे व्यवस्थापन म्हणजे एक डोकेदुखी व मनस्ताप असतो. भाडी गोळा करणे, बँकेत भरणा करणे, पाणी/वीज/ प्रॉपर्टी टॅक्स यांची बिले भरणे, माळी, सुरक्षा, लिफटमन यांच्यावर देखरेख ठेवणे, दुरुस्ती देखभाल करणे, हिशेब ठेवणे अशी अनेक कामे असतात. कार्यकारिणीचे सभासद म्हणून कुणाला राहायचे नसते, जे मारुन मुटकून सभासद होतात त्यांना वेळ नसतो. आम्ही ही सगळी ए टु झेड कामे करण्याची जबाबदारी घेतो. आमच्याजवळ सध्या अनेक संस्थांचाी कामे आहेत. त्यांत टाटा हाऊसिंग, लक्ष्मी इंडस्ट्रीयल सारख्या मातब्बर संस्था आहेत. त्याशिवाय लघु उद्योग सुरु करण्यासाठी आमच्याजवळ नोंदविलेले अनेक ट्रेड मार्क्स आहेत.

**उद्दिष्ट :** सेवा पुरविण्यासाठी आम्हाला मनुष्यबळाची आवश्यकता आहे. इच्छुक ज्ञाति बांधवानी आमच्याशी संपर्क साधावा. त्यांना अर्थार्जन करण्यासाठी आम्ही साहाय्य करु तसेच आमच्या ट्रेड मार्क्सच्याद्वारे व्यवसाय सुरु करण्यासाठी आम्ही मार्गदर्शन करु. ज्ञातिबांधवांची सेवा हेही आमचे उद्दिष्ट आहे.

**संपर्क : न. अ. जोशी : ९८१९३०४५९९ / ९९२०४०४५९९**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :** पोस्ट बॉक्स ११९९०, आझाद नगर पोस्ट ऑफीस, अंधेरी (प.), मुंबई –४०००५३

SERVICE FIRST ®

9819304599 9920404599

**सर्वप्रथम सेवा®**

**SOCIETY SERVICE RESOURCE**

# "मुगले आझम, आणि शाल्मली झणकर"

श्री शान्तादुर्गेच्या चरणी आपली नृत्यपूजा सादर करणाऱ्या 'शाल्मली झणकर' हिच्या कलानिपुणतेची ओळख 'मुखपत्रिके'च्या वाचकांना झालेलीच आहे. तिच्या यशरुपी शिरपेचात आणखी एक मोरपीस झळकले आहे, ते एका लोकप्रिय कार्यक्रमात!

आजकाल भारतात ठिकठिकाणी, तसेच दुबई, सिंगापूरसारख्या परदेशातही वाहवा होत असलेला हा कार्यक्रम, म्हणजेच 'मुगले-आझम' हा नृत्याविष्कार!

अलौकिक सौंदर्याची देणगी लाभलेली 'मधुबाला', अभिनयात अग्रेसर 'दिलीपकुमार' यांच्या भूमिकांनी नटलेल्या, 'नौशाद' यांच्या संगीताने सजलेल्या, 'के. असिफ' यांच्या 'मुगले-आझम' या चित्रपटाने एकेकाळी रसिकमनांवर अक्षरश: जादू केली होती! याच चित्रपटाची कथा, त्यातील सुमधुर गीते, यांवर आधारलेला नृत्य-निवेदनात्मक असा कार्यक्रम करण्याची एक अनोखी कल्पना 'एन्. सी.पी. ए.' ने श्री. 'शापूरजी पालनजी' यांच्या सहकार्याने साकार करण्याचे ठरविले. अर्थात कल्पना रम्य असली, तरी ती प्रत्यक्षात उतरविणे अत्यंत अवघड होते. पण 'श्री. फिरोझ अब्बास खान' यांनी त्याची जबाबदारी सांभाळली, तिला मूर्त स्वरुप दिले, अत्यंत समर्थपणे!

आपल्या कथ्थक-गुरु 'श्रीमती मनीषा जीत' यांच्या सांगण्यावरुन कलाकारांच्या निवडीसाठी घेतल्या जाणाऱ्या ऑडिशन्स्, व्हिडीओ माध्यमातील टेस्टस् वैगेरेंमध्ये 'शाल्मलीने' भाग घेतला, तिची निवडही झाली, आणि आज या कार्यक्रमातील प्रमुख नृत्यांगनांपैकी ती एक आहे.

'नृत्तरुत्य' या संस्थेच्या 'श्रीमती मयूरी उपाध्या' यांच्या मार्गदर्शनाखाली तीन महिने सराव करुन हा कार्यक्रम बसविण्यात आला. 'कमालिस्तान स्टुडिओ' मध्ये डान्सर्स व ॲक्टर्स यांची पहिली रिहर्सल झाली. त्यानंतर 'एन्.सी.पी.ए.'च्या भव्य मंचावर सेट डिझायनर्स, प्रोजेक्ट डिझायनर्स, लाईट-साऊंड-टीम, स्टेज् -मॅनेजमेंट-टीम या सर्वांसह महिनाभर तालीम (प्रॅक्टिस्) घेण्यात आली. कारण हे सर्व कारागीर, तसेच अठ्ठावीस नृत्यांगना या सर्वांचा समन्वय साधणे कठीण होते. एखादी चूकही महागात पडू नये, यासाठी इतकी तालीम आवश्यकच होती.

'मुगले-आझम' ही कथा मोगल राजघराण्याची असल्यामुळे नैपथ्य वैभवशाली असणे, हे ओघानेच आले. त्यातील सर्वच देखावे विशेषत: राजदरबाराचे बदलते देखावे अक्षरश: डोळयांचे पारणे फेडतात! या कारागिरीसाठी न्यूयॉर्कहून 'ब्रॉडवे'त काम करणारे कुशल कारागीर आणवून नेपथ्याची शोभा दृष्ट लागण्याजोगी केली आहे. स्थानिक सहाय्यकांना मदतीस घेऊन "डेव्हिड लँडर, नील पटेल, जॉन नरुन" या खास आलेल्या कारागीरांनी "प्रकाशयोजना, नेपथ्य, ध्वनिसंयोजन" या महत्त्वाच्या तांत्रिक बाबी अप्रतिमपणे सांभाळल्या आहेत!

कार्यक्रमात चित्रपटातील सर्व गाण्यांखेरीज आणखी तीन वेगळी गाणीही आहेत.

नृत्यांगना मंचावर नृत्य करीत असताना ‘अनारकली’ची भूमिका आळीपाळीने रंगविणाऱ्या ‘प्रियांका बर्वे व नेहा सरगम’ या गायिका सुरेल आवाजात गातात, पण वाद्यांची साथ ध्वनिमुद्रित असते. साऱ्या कलावती येतात, कला पेश करतात, नि रसिकांची मने जिंकून घेतात!

या सर्वात शाल्मली अग्रभागी असतेच. विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे शेवटच्या गाण्यात मंचावर ‘चोवीस चक्री’ घेत जेव्हां ती नृत्य करते, तेव्हां टाळयांचा अखंड गजर प्रेक्षकांकडून होत राहतो, आणि प्रख्यात नृत्यांगना ‘कुमुदिनी लाखिया’ यांच्यासारख्या अनेक जाणकारांकडून तिला शाबासकीची थाप मिळते!

मुंबई, दिल्ली, अहमदाबाद, बंगलोर अशी भारतभूमी जिंकत ‘मुगले-आझम’ ने ‘दुबई, सिंगापूर’ याही ठिकाणी यशश्री हस्तगत केली आहे. मूळ चित्रपटाचे निर्माते-दिग्दर्शक ‘के. असीफ’ यांची कन्या, नातू यांनी दुबईत या कार्यक्रमाला खास उपस्थित राहून खूप प्रशंसा केली. सिंगापूरमध्ये, इंग्लंड येथील ‘आल्बर्ट हॉल’च्या तोडीच्या ‘एस्प्लनेड या विशाल प्रेक्षागारात खच्चून भरलेल्या प्रेक्षकांनीही कार्यक्रमाला प्रचंड दाद दिली.

नृत्यकलेतील जाणकार हेमा मालिनी, रेखा, बिरजू महाराज, शामक दावर वगैरेंनी, सिने-क्षेत्रातील वहिदा रेहमान, शबाना आझमी, अनिल कपूर, जावेद अख्तर अशा अनेक कलावन्तांनी, तर अरुण जेटली, लालकृष्ण अडवानी, मनमोहन सिंग, शरद पवार, यांसारख्या कित्येक राजकीय नेत्यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून गौरवाचे उद्‌गार काढले आहेत.

या कार्यक्रमाबरोबरच शाल्मलीचाही नृत्यप्रवास सतत यशस्वीपणे चालत राहो, ही शुभकामना!!

हे नृत्य मूळ चित्रपटात सुविख्यात नर्तक ‘गोपीकृष्ण’ यांनी केले होते.

**श्रीमती नीलिमा शशिकान्त नाडकर्णी, माहीम**
**(२४३०९५४४)**

## विवाह /वाङ्‌निश्चय

| | | |
|---|---|---|
| पूजा प्रसाद हिचकड, माहीम | व | अभिषेक चंद्रशेखर डांगरे, कॉटनग्रीन |
| प्रसाद उमेश कसबेकर, वाळकेश्वर | व | वैभवी प्रेमचंद प्रभू, परळ |

**SHREE HOMOEOPATHIC PHARMACY**
**Wholesale & Retail For :**
**Genuine Indian & Imported Homoeopathic Medicines**
Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Tel. : 2438 3092 / 2430 9035 Mob. : 98694 83433
Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**
**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) , Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**

# ऋणको ते धनको - एक अनोखा प्रवास - (२)

ऋणको ते धनको या विषयावर लेख लिहिण्याचा माझा फक्त एकच उद्देश आहे. तो म्हणजे–माझे अनुभव, जर माझ्या ज्ञातिबांधवांना प्रेरणादायक ठरले व त्यांना कार्यसफलता प्राप्त झाली तर माझ्या इतका आनंद कुणालाच होणार नाही आणि या आंनदाचा फायदा मी अगदी पुरेपूर घेणार आहे.

कामधंद्यात किंवा आरोग्यात अतिशय वाईट परिस्थिती आली असताना केवळ निश्चिंतपणे फक्त आईशांतादुर्गेवर संपूर्ण विश्वास ठेऊन तिने सुचीत केल्याप्रमाणे कार्य केल्याने पुरेपूर सफलता मिळते. हाच माझा अनुभव!

मी अगदी प्रामाणिकपणे माझे हे अनुभव आपल्यासमोर ठेवीत आहे व आईशांतादुर्गेला साकडे घालत आहे की – हे आई! मला मदत केल्याप्रमाणे माझ्या या ज्ञातिबांधवांच्या हाकेलासुध्दा तू प्रतिसाद दे आणि संकटातून त्यांना बाहेर काढ व कार्यसफलतेसाठी त्यांना यथोचित मार्गदर्शन कर.

महापंचमीची पूजा माझे आजोबा श्री. दत्तात्रय रामचंद्र कसबेकर कारवारला "वाढत" होते. आजोबानंतर माझे वडिल श्री. भास्कर दत्तात्रय कसबेकर यांनी १९६७ पासून ही पूजा मुंबईत "वाढली". त्यांच्या देहांतानंतर १९८० पासून आजतागायत म्हणजे गेली ३८ वर्षे मी "वाढत" आहे. यथासांग ब्राह्मण, सवाष्ण, बाहेरची सवाष्ण सकट. मी गेली ३८ वर्षे– दरवर्षी ५ वेळा महापंचमीची पूजा करत आहे असे म्हणून, सर्वश्रेय मी स्वत:लाच घेतले तर हे अत्यंत चुकीचे आणि अन्यायाचे ठरेल. पूजेचे साहित्य, यथोचित तयारी, प्रसादाची तसेच भोजनाची सामुग्री आणण्यापासून ते स्वयंपाक वगैरे तयार करण्यापर्यंत संपूर्ण श्रेय माझी पत्नी सौ. मंगला–पूर्वाश्रमीची प्रभा नीळकंठ पिकळे हिलाच देणे योग्य ठरेल. बऱ्याचवेळा मदतीला कोणीही नसताना पूजेची तयारी तसेच २०–२५ लोकांचा स्वयंपाक तिने एकटीने जरासुध्दा कुरकुर न करता, केला होता व ते सुध्दा पूर्णपणे देवीवरील प्रेमाने, श्रध्देने आणि आवडीने! सुरुवातीला २०–२५ जण असायचे. आता, वयोपरत्वे जास्तीत जास्त ५ जण – ब्राह्मण, सवाष्ण, बाहेरची सवाष्ण बोलावतो. माझे कार्य फक्त पूजा करणे. खरेच! स्वजातीय मुलीशी लग्न केल्यानेच हे शक्य झाले. त्यातून माझ्या पत्नीचे शालेय शिक्षण कारवारला "बाड" येथे झाले होते. तिचे आजोबा श्री. विश्वंभर अंबादास वर्टी, जे स्वत: श्री. शांतादुर्गेचे परमभक्त होते व अत्यंत नियमीतपणे महापंचमीची पूजा करत असत. त्यामुळे तिला लहानपणापासून या सर्व पूजेची आवड होती व मोठया उत्साहाने व प्रेमाने ती सर्व कार्ये करत असे व अजूनही करत आहे.

या पूजेच्या जबाबदारीमुळे आम्हा उभयतांना महापंचमीला गोव्याला श्री. शांतादुर्गेच्या मंदिरात जाण्याची तसेच ललितापंचमी, वसंतपंचमीचा उत्सव, जत्रेत सहभागी

होण्याची संधी नव्हतीच. फक्त एकदाच माझ्या बंधूने एकाच महापंचमीची जबाबदारी घेतली व आम्ही गोव्याला आलो. पण ती प्रचंड गर्दी, निव्वळ कुंकुमार्चन अभिषेक करण्यासाठी ब्राह्ममुहुर्तापासून लागलेली भक्तांची रीघ, एका महाजनाने अजाणतेपणे गाभाऱ्याबाहेर असलेल्या – जेथे जानवे बदलले जाते तेथे – सोवळयाशिवाय प्रवेश केल्याने विनू पेंडसे भटजींचे त्यांच्या अंगावर अक्षरश: कुत्र्यासारखे भुंकणे मला खूपच खटकले. मी भटजींना शांतपणे म्हटलेही की, आपण एका महाजनाचा अपमान करीत आहात. आज तुमचे देवळातले अस्तित्व या महाजनांमुळेच आहे पण तो मस्तवाल विनू पेंडसे काही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता आणि भुंकतच राहीला. कल्पनेबाहेर आरामात भरपूर कमाई होत असल्याने अक्षरश: माजलेल्या मनोवृत्तीत तो विनू पेंडसे दिसत होता. त्या क्षणापासून महापंचमीला मला मंदिरात जाता येत नाही म्हणून जी खंत होती ती नाहीशी झाली. त्यानंतर मी एका नियमच केला – किमान दोन वर्षातून एकदा तरी कवळे मंदिरात जायचे आणि ते सुध्दा अशावेळी जेव्हा भक्तगणांची उपस्थिती अगदीच कमी असेल. कुंकुमार्चन करताना देवीच्या पदकमलांना कधी स्पर्शही होई. अशावेळी बऱ्याच इच्छा मनात असून सुध्दा मी काहीही मागत नसे. पण काहीही न मागता मला इतके समाधान व शांती मिळे की ती आठवणीची शिदोरी दोन–तीन वर्षे तरी सहज पुरत असे.

**रोज घरी देवीची पूजा करताना मी तिची चरणकमळे डोळयासमोर आणून जर ध्यान केले तर अशावेळी माझ्या समस्यांचे उत्तर माझ्या मनात विचारमार्गे येई ते विचारच श्री देवीचा सल्ला समजून, मी माझी कार्यकरणी त्याप्रमाणे आखून (determine the line of action) निश्चित कार्यसिध्दी प्राप्त करीत असे.**

माझ्या आयुष्यात अनेक जटील प्रश्न आले होते व ते सोडविण्याचे व त्यातून बाहेर पडण्याचे काही मार्ग दिसत नव्हते. अशावेळी आईशांतादुर्गेने मला सर्वतोपरी मार्ग दाखविला व जो भीषण अंधकार माझ्या डोळयासमोर होता त्याला सकाळच्या प्रसन्न उजेडात परावर्तीत केले. असे अनेक प्रसंग मी तुमच्यासमोर मांडणार आहे.

देवीकृपेची अनुभुती ( १ ) – आम्हाला ४ मुले – १ मुलगा आणि ३ मुली. असे भुवया वर करुन पाहू नका, आम्ही भारताची लोकसंख्या अजिबात वाढवली नाही. आमच्या तीनही मुली भारताबाहेर युरोप, अमेरिकेमध्ये स्थायिक आहेत आणि त्यांची भारतात कायमस्वरुपी परत येण्याची शक्यता अजिबात नाही. तेव्हा आम्ही दोन आणि आमचा भारतात फक्त एकच! तर आमचा हा भारतामधील एकच – अतुल १९८३ मध्ये बारावी अतिशय उत्तम मार्कांनी पास झाला व पहिल्या फटक्यातच त्याला UDCT त Chemical Engineering (B. Chem.) करिता प्रवेश मिळाला. एका वर्षात 1$^{st}$ year B.Chem. चांगल्या मार्कानी पास झाला. पण एकेदिवशी

मला म्हणाला– पपा! मला केमिकल इंजनिअरींगचा अगदी तिटकारा येतो. मला Arts ला जायचे आहे. मला ॲडव्हरटाईझिंग किंवा जर्नालिजममध्ये प्रोफेशन करावयाचे आहे. त्याचा चेहरा अगदी रडकुंडीला आला होता. मला काहीच सुचेना. जगप्रसिध्द UDCT, मधून B. Chem. व्हायचे सोडून B. A. आणि ते सुध्दा 1st year B.Chem. मध्ये मेरिट लिस्टमध्ये येऊन! सर्वांनी मलाच दोष दिला असता. १९ वर्षाचा मुलगा सांगतो आणि बाप त्याला B. Chem. सोडून B. A. करायला परवानगी देतो! केवढा हा मूर्खपणा! शेवटी मी अतुलला एक उपाय सुचवला – आपण गोव्याला देवीच्या मंदिरात जायचे व देवीला कौल लावू व त्यातून जे काही निष्पन्न होईल ते आम्हा दोघांवर बंधनकारक असेल. अतुल तयार झाला. दुसऱ्याच दिवशी आम्ही मंदिरात गेलो व कौल लावला. तो १००% अतुलच्याच फेवरमध्ये आला आणि अतुलने 1st year B. A. जॉइन केले. 1st year B.Chem. पास झाल्याचा फायदा झाला नाही व १ वर्ष फुकट गेले. आर्टसच्या प्रथम वर्षी अतुल, ॲड–फिल्मस् बनविणारे प्रख्यात पेप्सीफेम श्री. प्रल्हाद कक्कर यांना असिस्टंट म्हणून काम करु लागला. Maggie Noodles ची "बस एक मिनीट " ही जाहिरात तुम्हाला आठवत असेलच. तिच्यावर अतुलने खूप मेहनत घेतली होती. अतुल नंतर एकेदिवशी मला म्हणाला की त्याला आता पूर्ण खात्री झाली आहे की, आयुष्यात त्याला काय करावयाचे आहे "मला फोटोग्राफर व्हायचे आहे." आम्हाला एकच मुलगा आहे हे जाणून मी त्याचा विचारले की जगात उत्तम फोटोग्राफीवर शिक्षण देणारी संस्था कुठे आहे. चौकशी करता कळले की, Brookes Institute of Photography - Santa Barbara, USA ही ती संस्था आहे. पण फी खूपच अवाढव्य आणि स्कॉलरशिप्स् अजिबात नाहीत. परत एकच मुलगा आहे हा विचार करुन मी माझा वरळीचा सुरेख, सी–फेसिंग फ्लॅट विकला आणि अतुलने "Brookes" जॉईन केले. चार वर्षापैकी एक वर्षाची फी मी भरली. पुढील तीन वर्षाची फी वगैरे, अतुलने एका रेस्टॉरन्टमध्ये वेटरचे काम करुन, लोकांच्या गाडया रोज सकाळी धुवून, तसेच त्यांच्या कुत्र्यांना फिरवून आणून मिळालेल्या पैशांतून पूर्ण केली. त्याला त्या रेस्टॉरन्टमध्ये "Chief Waiter" ची बढती पण मिळाली होती. चिफ वेटरचा सॅटीनचा युनिफॉर्म त्याने अजून जपून ठेवला आहे. B. A. (Photography) ची परीक्षा तो अतिशय उत्तमप्रकारे पास झाला. सर्व विषयात पहिला आला व "Brookes" मध्ये तो रेकॉर्ड ठरला. त्याला तसे सर्टिफिकेटही मिळाले. हॉलीवुडमध्ये त्याला सहज एंट्री मिळाली असती, पण तो मुंबईला आला.

मुंबईला आल्यावर काय काय केले ते मी इथे लिहित नाही. पण त्याने दोन वेळा आंतरराष्ट्रीय बेस्ट फोटोग्राफरचा किताब ते हिंदी चित्रपट निर्माण करण्यापर्यंत मजल मारली. (नीरजा, तुम्हारी सुलु) शिवाय बरीच पारितोषिके मिळविली व आज तो एक चांगल्यापैकी Celebrity समजला जातो हॉलीवूडच्या बऱ्याच नटनट्यांना तसेंच प्रख्यात जगविख्यात क्रिकेट,

टेनीस व फुटबॉल पटूंना वेगवेगळया जाहिरातींमध्ये अतुलच्या कॅमेराने शुट केले आहे. जेम्स बाँड प्रसिध्द Pierce Brosnan ची ओमेगा रिस्ट वॉचची जाहिरात अतुलने केली ब्रासननने जाहिरातीत वापरलेले ओमेगा घडयाळ शूटनंतर अतुलला दिले व अतुलने ते मला दिले. अमिताभ बच्चन, आमिर खान पासून सगळे नावाजलेले नटनटया अगदी माझ्या वरळी ऑफीसला लागून असलेल्या अतुलच्या स्टुडीओमध्ये येऊन गेल्या. अमिताभ, सचिन, युवराज, सन्नी देओल वगैरे कोणी आले तर तो त्यांना आवर्जुन माझी भेट करुन देत असे. पण माधुरी दिक्षीत, कतरीना कैफ वैगेरे असल्यास शेजारी असून सुध्दा आम्हाला पत्ता लागू देत नसे. यावरुन अतुलच्या मातृभक्तीची कल्पना येईल. कतरीना कैफ, याना गुप्ता, दीपिका पादुकोण, जॉन अब्राहम, राहुल देव केवळ अतुलमुळेच Bollywood मध्ये येऊ शकले. बरेच पोलीस अधिकारी, I.G., D.G.P., कमशिनर्स, स्वत: मुख्यमंत्री विलासराव देशमुख, सुशीलकुमार शिंदे, शरद पवार वगैरे सुरक्षिततेच्या दृष्टीने वरळीला अतुलच्या स्टुडिओत जाण्याऐवजी, मंत्रालयाजवळ असलेल्या माझ्या घरी मोतीमहलमध्ये अतुलकडून फोटो काढण्यासाठी येत असत. श्री. धीरुभाई अंबानींचा हनुवटीवर बोट ठेऊन काढलेला प्रख्यात फोटो अतुलनेच काढला होता.

सर्व कॉलेजच्या Students' unions चा अतुल अतिशय आवडता! त्याला कॉलेजमध्ये बोलविण्यासाठी चढाओढ लागते. एकदा K.C. कॉलेजमध्ये अतुल भाषण देत होता. सर्व सीट्स (जवळजवळ ७००) अगदी फुल्ल आणि कॉरिडोरमध्येही जमिनीवर बसलेले व बाजूला खच्चून उभे राहिलेले जवळजवळ तेवढेच विद्यार्थी अगदी तन्मयतेने अतुलचे अस्खलीत इंग्रजीत भाषण ऐकत होते. अतुल सांगत होता– "बाप डॉक्टर आहे म्हणून मुलाने सुध्दा डॉक्टरी पेशा निवडणे जरुरी नाही. तुमच्या आवडीचा असा पेशा निवडा की कामाचा प्रत्येक क्षण तुम्ही आनंदात घालवत आहात. तुम्ही काम करीत नाहीत जणू फक्त मौजच करीत आहात!"

आता तुम्हीच ठरवा एक Chemical Engineer करिअर बरे की अतुलचे World Celebrity StatusI

ही सर्व माझ्या देवीचीच कृपा!

**अरुण भास्कर कसबेकर**
**९८२०२९१३६५/ ८७७९९८६६०६**
**arunkasby@gmail.com**

# हळदी कुंकूसमारंभाविषयी आधुनिक विचार

ठाणे मंचची स्थापना सप्टेंबर १९९६ च्या सुमारास झाली. तेव्हापासुनच ठाणे-मुलुंड मधील भगिनींचे एक श्रावणातील एक व मकरसंक्रांतीचे एक असे दोन हळदी-कुंकू समारंभ सुरु झाले. हे समारंभ हॉलमधे न होता, कुणाच्या ना कुणाच्या एक निवासस्थानी होत असतात. भगिनीही 'पुढच्या वेळी माझ्या घरी करु या ग' असे अगत्याने सांगत असतात. ज्यांच्या घरी हळदीकुंकू होत असते त्यांना अगदी काय करु, काय नको असे होत असते. जरी हे समारंभ ठाणे मंचच्या निधीतुतन केले जात असले तरी सर्व भगिनी त्यांच्या परिश्रमाने, आनंदाने आपल्या घरचेच कार्य असल्यासारखे साजरे करतात. चटकदार नाश्ता, काजू बदाम, केशरयुक्त मसाले दूध असा साग्रसंगीत मेन्यू, शिवाय संक्रातीला छानसे वाण, सर्वांच्या गाठीभेटी आनंद सोहळेच असतात दोन्ही समारंभ.

गेली ३०-३२ वर्षे ठाणे + मुलुंड येथे कारवारी भिशी मंडळ चालू आहे त्यामुळे बऱ्याच स्त्रिया एकमेकींच्या संपर्कात असतात. त्यामुळे हळदीकुंकवाचे आमंत्रण जरी मुखपत्रिकेत असले तरी व्यक्तीशःही इतर महिलांना फोनवर वैगेरे संपर्क साधुन आमंत्रित केले जाते. सर्वात मुख्य म्हणजे ठाणे मंचच्या हळदी-कुंकू समारंभात सुरवातीपासुनच कधीही कसलाही भेदभाव केला जात नाही, मग ती कुमारिका असो, परित्यक्ता असो, सुवासिनी असो, विधवा असो वा घटस्फोटीता. सर्वांनाच प्रेमाने आदराने बोलावले वागविले जाते.

प्रत्येक स्त्रीचे आपल्या पित्याशी, भावाशी नवऱ्याशी मुलाशी आदराचे, प्रेमाचे, विश्वासाचे मायेचे नाते असते. असे असले तरी यातली एखादी व्यक्ती जरी तिच्या आयुष्यातून काही करणामुळे वजा झाली की भावनिक पोकळी नक्कीच निर्माण होते, त्यातून जन्माचा सहचर अंतरल्याने ती सर्वस्वच गमावते पण त्यातुनही ती स्वतःला सावरते व स्वतःच्या कर्तव्यात किंवा कर्तृत्वात कुठेही कमी पडत नाही.

एन के जी अेस बी संघाचा प्रथम हळदीकुंकू समारंभ १९ जानेवारी १९३६ साली सुरु झाला, म्हणजे ठाणे मंचच्या जवळ जवळ ६० वर्षे आधी. अर्थातच त्या काळी बायकांना घरगुती कार्याशिवाय विरंगुळा असा नव्हताच. देवदर्शन व हळदीकुंकवाच्या निमित्ताने त्यांच्या गाठी-भेटी होत. त्यावेळेच्या प्रथेनुसार हळदीकुंकू साजरे करण्याचा मान सुवासिनींनाच असायचा. पण आज समाजाने कितीतरी चुकीच्या रुढी-रिवाज, प्रथांना तिलांजली दिली आहे. पण कधी कधी संभ्रमावस्था निर्माण होते. आमंत्रण देणारीला वाटते 'मी बोलावल्याने समोरचिच्या भावना तर दुखावल्या जाणार नाहीत.' आणि काहीजणीना वाटते 'अरे मला बोलावलेच नाही मी कशी जाऊ?' तर मैत्रिणीनो, २१ व्या शतकात ह्या प्रथा मोडायलाच हव्यात ना? तरी संघाच्या दोन्हीं श्रावणातील (जोगेश्वरी) व संक्रातीच्या (माहीम) या दोन्ही

हळदीकुंकू समारंभाना प्रत्येक भगिनीने आवर्जून हजेरी लावावी.

आपले कृपाभिलाषी

| | | |
|---|---|---|
| नीलिमा नाडकर्णी | जयश्री भेडसगावकर | चित्रा कामत |
| किशोरी वागळे | शांता पालेकर | मंजिरी कुलकर्णी |
| मृदुला भांडारकर | | |

■■■

**।। श्रीमंगेश प्रसन्न।।**

**श्री मंगेश देवस्थानांत अतिरुद्र स्वाहाकार सोहळा**

**इच्छुक प्रवाशांसाठी आरक्षित रेल्वे डब्याची सुविधा**

**श्री मंगेशी येथे दिनांक ८ डिसेंबर ते २० डिसेंबर या कालावधीत अतिरुद्र स्वाहाकार अनुष्ठान हा एक अविस्मरणीय सोहळा संपन्न होत आहे. त्याचे निमंत्रण ज्ञातिबांधवांना आतांपर्यंत मिळालेच असेल. त्या निमंत्रणपत्रिकेतील तपशीलावरुन या सोहळ्याची भव्यता लक्षांत येते. हा सोहळा केवळ श्रीमंगेश देवस्थानच्या महाजनांसाठी मर्यादित नसून श्री शांतादुर्गा देवस्थानांच्या महाजनांचीही उपस्थिती प्रार्थनीय आहे. ज्या उभय देवस्थानच्या कुळाव्यांना या सोहळयाला उपस्थित राहावयाची इच्छा असेल त्यांच्या सोयीसाठी रेल्वेचा ७६ आसनी बिगर वातानकुलीत डबा राखीव ठेवण्यात येणार आहे. त्याचे वेळापत्रक खालीलप्रमाणे**

**१) दादर ते गोवा निर्गमन ११ व १५ डिसेंबर**

**२) कर्माळी ते दादर निर्गमन १२ व १६ डिसेंबर**

**दादरहून ७ डिसेंबर रोजी व कर्माळीहून २० डिसेंबर रोजी सुटण्याच्या रेल्वेच्या गाडयांच्या आरक्षणासाठीही साहाय्य पुरविण्यांत येईल.**

**आरक्षणासाठी रेल्वेचे अधिकृत बुकींग एजंट**

**M/s. Akshay Enterprises - Mob. : 9405256056 / 9922888682**

**phone : 0263 - 271818**

**यांच्याशी इच्छुक प्रवाशांनी त्वरीत संपर्क साधावा.**

## तरुणींचे लक्ष वेधण्यासाठी – 'भगिनी सक्षमता फोरम'

जुलै २०१७ मध्ये समाजासाठी काहीतरी करु पाहणाऱ्या कांही समविचारी भगिनी एकत्र आल्या. त्यांच्या चर्चेतून आर्थिक आणि सामाजिक दृष्टया दुर्बल घटकातील तरुण स्त्रियांसाठी काहीतरी भरीव ठोस कार्य करण्याची कल्पना जन्माला आली आणि भगिनी सक्षमता फोरमचं रोपटं रुजलं गेलं. तळागाळातील स्त्रीला जेव्हां आर्थिक स्वातंत्र्य मिळेल तेव्हा ती खऱ्या अर्थाने सक्षम होईल ह्यावर त्यांचा ठाम विश्‍वास होता. हेच ध्येय उराशी बाळगून श्रीमती अचला जोशी आणि लता पालेकर ह्यांच्या नेतृत्वाखाली "घे भरारी" ह्या अभियानाची स्थापना झाली. ह्यात लक्ष्मी नाडकर्णी, मेधा मयेकर, मुक्ता वालावलकर आणि उत्तरा मोने ह्या इतर समविचारी भगिनींचाही समावेश केला गेला.

अभियानाचे उद्‌घाटन १८ नव्हेंबर २०१७ मध्ये राजा शिवाजी विद्यालयात जन जागरण मेळावा आयोजित करुन करण्यात आले. त्याला लोकांचा उदंड प्रतिसाद लाभला. सुमारे १२०० लोकांनी हजेरी लावली.

हे अभियान १८ ते ३५ वर्षाच्या वयोगटातील मुलींसाठी खालील चार प्रकारचे कोर्सेस आयोजित करते की जे रोजगार निर्मितीसाठी पूरक आहेत. अगदी निशुल्क.

१) टेलरिंग २) फॅशन आर्ट ज्वेलरी ३) बॅक ऑफिस ट्रेनिंग आणि ४) ॲडव्हान्स ब्युटिशिअन कोर्स

ह्या कोर्सेसचा कालावधी १५ दिवस ते २।। महिन्यांचा आहे. कोर्सेसचे शुल्क आणि इतर साहित्यासाठी लागणारा संपूर्ण खर्च अभियान उचलते. इतकेच नाही तर कोर्स पूर्ण केल्यावर मुलींना नोकरी मिळवून देण्याचा अथवा स्वत:चा छोटा उद्योग सुरु करण्यासाठी मार्गदर्शन करण्याचा प्रयत्नही अभियान करते. आजतागायत सुमारे २५० तरुणींनी या संधीचा फायदा घेऊन हे कोर्सेस यशस्वीरित्या पूर्ण केलेले आहेत. बॅक ऑफीसच्या ४० मुलींना नोकरी मिळाली आहे तर टेलरिंग, जुवेलरी आणि ब्युटीशियनच्या बहुसंख्य मुली स्वत:चा व्यवसाय सुरु करुन अर्थार्जन करत आहेत.

आमचा अनुभव हा आहे की स्वत:च्या पायांवर भक्कमपणे उभे राहिल्याने ह्या सर्व तरुणींचा आत्मविश्‍वास कमालीचा उंचावला आहे. ह्यासाठी आम्ही तुम्हाला आवाहन करतो की आपल्या परिचयात अशी कोणी गरजू तरुणी असेल आणि तिच्यात परिस्थितीवर मात करण्याची ईर्षा असेल त्यांना तुम्ही अधिक माहितीसाठी आमच्याशी संपर्क साधण्यास सांगू शकता.

आपण हे नक्की कराल आणि आमचे मनोबल उंचावाल ह्यासाठी फोरम आपले आधीच आभार मानतो.

**लता पालेकर**
**९८२१०२२८८२**

**लक्ष्मी नाडकर्णी**
**९९२०९७२९०८**




SIP in Mutual Funds will help you to save regularly & discipline manner,
To achieve your goal..

| Monthly Investment required for target of Rs.1 Crore | | | |
|---|---|---|---|
| No. of Years | CAGR Returns | | |
| | 12% | 15% | 18% |
| 10 | Rs. 43,471/- | Rs. 36,335/- | Rs. 29,739/- |
| 15 | Rs. 20,017/- | Rs. 14,959/- | Rs. 10,879/- |
| 20 | Rs. 10,109/- | Rs. 6,679/- | Rs. 4,267/- |
| 25 | Rs. 5,322/- | Rs. 3,083/- | Rs. 1,717/- |

**Mangsidesh Investments Pvt Ltd.**

Head Office : 402, Business Point Bldg, Behind Brahma Kumari Hosp., Andheri (West)
Tel No. 022 - 4233 2323/ 6584 1233/ 6523 8964
Branch Office : A/53, Shanti Shopping Centre, Next to ICICI ATM, MiraRoad 401 107
Tel No. +91 91672 20380 / 022 - 2855 2111/ 2812 7555
1/11, Kappeesh Tower, M.G. Road, Mulund (West), Mumbai 400 080
Tel No. + 91672 20379/ 022 - 6500 1366

Mutual Fund Investments are subject to market risks, Read all schemes related documents carefully.

# यमुना बोरकर – त्यागमूर्ती अम्माई

अम्माई ! अम्माई म्हणजेच यमुना यशवंत बोरकर. ती यशवंत व अन्नपूर्णा बोरकर यांची थोरली कन्या. तिला दोन बहिणी सुशीला, (हीरा जिवाजी वागळे) व विमल आणि भाऊ माधव.

शिक्षणात हुशार, पण तिच्या आईच्या आजारपणामुळे व भावंडात सर्वात मोठी असल्या कारणाने, तिचं शिक्षण त्या काळच्या मॅट्रिक पर्यंतच झालं. आईची शुश्रूषा व घरकामात तिची किशोरावस्था व तारुण्य गेलं. आईची शुश्रूषा, वडिलांची सेवा व भावंडांची देखभाल केली व त्यासाठी ती आजन्म अविवाहित रहिली .... केवढा मोठा त्याग हा !

अम्माई आमची हरहुन्नरी होती. सुगरण, भरतकाम, एक सुई आणि २ सुयांचे विणकाम, शिलाई कामात तर ती पारंगत होती. हजरजबाबी, humourous, उत्साही, helpful व peoples person होती. मला आठवतं तिने मला एकदा म्हटलेलं, "माझ्याकडे पैसा नाही, पण ही जी सगळी लोकं आहेत ना, तीच माझी जमा पुंजी आहेत."

आमच्या घरी कोणीही कधीही आलं/राहिलं तर ती लोकं कधी ही रिकाम्या पोटी व हस्ते गेली नाहीत. तिने अन्न, भेटवस्तु व प्रेम भरभरुन दिलं. ती कुठल्याही वयोगटाच्या माणसात अगदी सहज मिसळून जाई. लहान–थोर, गरीब–श्रीमंत हा भेदभाव तिच्या अंगीच नव्हता जणू. ती आपलं घरकाम आटपून बालकनीत बसे व आलेल्या गेलेल्या माणसांची अगदी आपुलकीने व आस्थेने चौकशी करे. "यो, घरा यो" असा आग्रहही करे, जो कुणी कधीच नाकारला नाही ! प्रेमळ, लाघवी, बोलकी व तेवढीच Straight forward पण होती. तिचं मन अगदी मानसरोवराच्या पाण्यासारखं अगदी साफ, स्वच्छ व नितळ होतं. जे पोटात, तेच ओठात वाचनाची व अध्यात्माची दांडगी आवड असल्याने तिने बरेच धार्मिक ग्रंथ वाचले होते. नित्य नेमाने ती Hughes रोडवर असलेल्या प्रेमपुरी आश्रमात सकाळी जायची प्रवचन ऐकायला व रात्री घरा जवळील साईधाम मध्ये कीर्तन ऐकायला जात असे.

अम्माई काही महिने Ration office मध्ये कामाला होती. दुर्दैवाने तिला typhoid व paratyphoid झाला व नोकरी सोडावी लागली. तिने जे कांही पगारातून पैसे save केले ते सर्व पैसे घरासाठी वापरले. उमा, तिचा मानलेला भाऊ (द्वारकानाथ नेरुरकर, जोगेश्वरी) व मी तिला तिच्या वाढदिवसाला व दिवाळीला साड्या देत असू, पण ती त्यातल्या तीनच साडया वर्ष भर वापरत असे व बाकीच्या गरीब मैत्रिणींना, भाजीवाली, फुलवाली त्या पण..." असे ती म्हणे. स्वत: थोडंच खाई, पण लोकांना आग्रहाने प्रेमाने अगदी भर पेट वाढे. तिने अंगावर कधीच एकही सोन्याचा दागिना घातल्याचं मला आठवत नाही, but in retrospect, एका अमूल्य हिऱ्याला सोन्या–चांदीची काय गरज ? ते तिच्या तेजपूंज Personality पुढे फिकेच होते.

अम्माई अविवाहित होती, पण तिने तिच्या बहिणीच्या व भावाच्या मुलांना अगदी पोटच्या मुलांप्रमाणे जपलं, संगोपन केलं. अगदी निरपेक्षपणे केलं. हे सर्व करायला तिला तिच्या धाकटया बहिणीने, विमलने, संपूर्ण, स्वखुशीने व दिलखुलास पणे आर्थिक साथ दिली. कुठलाही सण वा कार्यक्रम असो, ती पदर खोचून उत्साहाने व आनंदाने कामाला लागे. होळी, दसरा, दिवाळी असो... घरात अगदी पक्वान्नांची रेलचेल!! दिवाळीच्या फराळात किंवा स्वयंपाक करण्यात तिचा हातखंडा होता.

अरे ! हो. दिवाळीच्या फराळावरुन आठवले... तिची मैत्रीण, जुन्या काळातील मशहूर गायिका मुबारक बेगम, दिवाळीच्या काही दिवस अगोदर घरी येऊन तिला म्हणायची, "जमुनाआपी, दिवाली आयी हैं। मुझें दिवालीका फराल देना। तुम्हारा बनाया खाना वाकई लजीज होता हैं। "१००% खरं होत बेगमचं म्हणणं. उमेद व उत्साह तिच्यात ठासून भरला होता. तिच्या जीवनरूपी शब्दकोषात कंटाळा व आळस हे शब्दच नव्हते! full of joie de vivre!! टि.व्ही. वर एखादी पाककृती पाहिली की लगेच अम्माई म्हणे, "चल कर्न पळव्या गो!" मला अम्माई कधी आजारी पडल्याचं आठवतही नाही. पण तिला जुलै २०११ मध्ये बारीक ताप व motions झाल्याचं निमित्त, आणि तिने पलंगाशी गट्टीच केली. हर कामात उमेद, उत्साही असणारी माझी अम्माई आता मात्र निस्तेज, मलूल व थकलेली मला दिसली. हे तिचं आगळं वेगळं रुप पाहुन मला फार अस्वस्थ वाटे. तब्बल ९ महिने तिने असे काढले व फेब्रुवारी १८,२०१२ ला तिने माझ्या समोर अखेरचा श्वास घेतला. त्या धक्क्यातून मी आज ६ वर्षांनीही सावरले नाही...

अम्माईने तिच्या लोकांसाठी व प्रियजनांसाठी खूप त्याग केला, खूप खपली, पण त्याचा उल्लेख कधीही केला नाही अथवा कसलीच अपेक्षाही कुणाकडून केली नाही. असली व्यक्ती ह्या जमान्यात मिळणं महा मुश्किल ! ह्याच तिच्या गुणांमुळे she had carved a niche for herself & place in people's heart & mind. She was a matriarch of Borkar family & she ruled it with satin gloves. सरते शेवटी श्री. शांतादुर्गे कडे एकच मागणे तिला मोक्ष तरी दे, नाही तर तिला या जन्मात जे काही हवं होते पण जे मिळालं नाही ते पुढच्या जन्मांत अगदी भरभरुन दे.

एक सूरज था तारों के घरानें सें उठा।
आँखे हैरान हैं, क्या शख्स जमाने सें उठा।
अशी होती माझी अम्माई, आमच्या बोरकर घराण्याची
आन, बान आणि शान!!!

**क्षमा बोरकर-शिरगांवकर**
**(२३८७८२९४)**

## VIMAL YESHWANT BORKAR - A NOBLE A DIVINE SOUL

३० जून २०१८ ला माझ्या उमाला (माझी आत्या विमल बोरकर) देवाज्ञा झाली. तिला मी मुखाग्नी दिला, घरी आले व माझ्या मनात ह्या चार ओळी आल्या...

बडी रौनक होगी आज, भगवान के दरबार में।
एक फरिस्ता पहुँचा हैं, जमीं से आसमान में।

उमा ही यशवंत व अन्नपूर्णा बोरकर यांची कन्या. शिक्षणात हुशार. राम मोहन शाळेतून मॅट्रिक झाली व विल्सन कॉलेज मधून संस्कृत (ऑनर्स) घेऊन उत्तीर्ण झाली. १९५० मध्ये आयकर विभागात तिला नोकरी लागली. विभागीय परीक्षा देत ती Income Tax मध्ये class - 1 officer च्या पदापर्यंत पोचली. ती त्या काळातील पहिली महिला officer होती. स्वच्छ कामकाज, an upright व Dedicated officer अशी तिची ख्याती होती. १९८१ मध्ये निवृत्त झाली व २ वर्षाने तिने स्वत:ची tax consultancy. १८ वर्षे चालवली.

तिने तिच्या कारकिर्दीत आयकराच्या अनेक धाडी घातल्या. बऱ्याच नामवंत व धनाढ्य लोकांकडे धाडी घालत असताना कांही जणांनी तिला लाखो रुपयांची लाच देऊ केली, पण तिने त्या नाकारुन आपले काम चोख बजावलं.

उमा was soft spoken, considerate, helpful, मितभाषी, साधी रहाणी पण उच्च विचारसरणीची होती. वाचनाची, शब्दकोडी सोडवण्याची दांडगी आवड. प्रवासाचीही आवड व त्यामुळे मला तिने भारत दर्शन घडवलं व travel bug माझ्यात ही घातला!

उमाचा व माझा संबंध अगदी माझ्या जन्मापासून तिच्या अखेरच्या श्वासापर्यंत होता. माझं शिक्षण, संगोपन सर्व काही तिनेच व तिच्या मोठया बहिणीने, म्हणजेच यमुना बोरकरने केलं हे सर्व तिने उदार व नि:स्वार्थ भावाने केले, अगदी आनंदाने, आपलं समजून व कसलीच अपेक्षा न ठेवता केलं.

म्हणतात ना, महान माणूस जातो (शरीराने) पण त्याचे विचार, संदेश ठेऊन जातो. तसच काहीसं माझ्या बाबतीत झालं. मला पहिली नोकरी लागली आणि पगाराचा पहिला चेक मिळाला. मी तो तिच्या हाती दिला. तो न घेता, पाहता मला म्हणाली, "तो चेक शांतादुर्गेच्या चरणी ठेव." मी ठेवला, व परत तिला दिला. ती म्हणाली, "हा चेक बँकेत घाल. आणि एकच लक्षात ठेव, don't run after money, let it run after you." तिच्या जीवनाचं एक principle मला त्या दिवशी उलगडलं, व ते आजवर ध्यानी ठेऊन निष्ठेने पाळत राहीन.

उमा was an epitome of simplicity, generosity, selflessness & a self-effacing lady. त्यांची उदाहरणे दिलीत, तर मुखपत्रिका पुरणार नाही! तिने तिच्या भावंडाना, नातेवाईकांना व इतर मंडळीना मुक्त हस्ते त्यांच्या पडत्या काळात गाजावाजा न करता व अपेक्षा

न ठेवता आर्थिक मदत केली. मला आठवतंय, दिवाळीत तिला तिचे assesses/clients भरपूर gifts, dry fruit boxes, वैगेर देत पण तिने त्यातील एकाही गोष्टीला हात न लावता, ते boxes, तिने नातलगांना व बिल्डिंग मधल्या लोकांना आनंदाने व मुक्त हस्ताने दिले. तिने बऱ्याच देवळांना, मठांना, अनाथालयांना व वृध्दाश्रमांना सढळ हस्ते देणग्या दिल्या. एकदा ती मला म्हणाली, "always fill an empty glass, not a full one." हे दुसरं principle मी तिच्या कडून शिकले.

अशी होती उमा व तिची मोठी बहीण यमुना. त्यांनी मला जन्म दिला नसता तरी त्या माझ्या सर्वार्थाने माता–पिताच होत्या, हे माझे अहो भाग्य. उमाची शेवट पर्यंत सेवा करता आली हे मी माझे सौभाग्यच समजते. म्हणतात ना, "जन्मदेनेवालेसे पालनेवाला महान होता है," हे तिच्या बाबतीत सार्थ आहे. त्या दोघींच्या निधनाने मी मात्र पोरकी झाली.. पण एक विचार मनाला दिलासा देतो की त्या दोघी आता श्री. शांतादुर्गेच्या मायेच्या कुशीत आनंदी व सुरक्षित आहेत. हिंदु धर्मात भावपूर्ण श्रध्दांजली वाहताना, "देव मृतात्म्यास सद्‌गती देवो," "गेलेल्या व्यक्तीस पुण्यगती मिळो," "त्यांचा पुनर्जन्माचा प्रवास निर्विघ्न पार पडो" अशी चाहता प्रार्थना करतो. म्हणून, मी उमा सारख्या सज्जन, सात्विक व पुण्यवान बाईला पुनर्जन्माचा फेरा देवाने न देता मोक्ष द्यावा अशी श्री शांतादुर्गे चरणी प्रार्थना करते.

**क्षमा बोरकर / शिरगावकर,**
**(२३८७८२९४)**

## मुंबई मंच - कारवारी मेळाव्याचे आमंत्रण

**'कारवारी खाद्यमेळाव्याला'** दरवर्षी मिळणाऱ्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे स्फूर्ती घेऊन यंदाही एक 'आनंद मेळावा' भरविण्यात येत आहे. पाककृतीशिवाय ज्यांना आपण बनविलेल्या वस्तू किंवा पदार्थ विक्रीसाठी किंवा प्रदर्शनासाठी ठेवायचे असतील, व ज्यांना बालगोपाळासाठी करमणुकीचे खेळ आयोजित करावयाचे असतील त्यांनाही गाळा मिळेल. इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा.

**तारीख व समय : रविवार २७ जानेवारी २०१९**
**कार्यस्थळ : सरस्वती बाग, जोगेश्वरी, के. जी. एस. सोसायटी पटांगण**
**आकार : रु. ८०० एका गाळयासाठी**
**संपर्क : गाळा आरक्षणासाठी व पाककृती ठरविण्यासाठी (रात्री ७ ते १०)**
**रसिका गायतोंडे : ९९६७४३४४०१ राजू बोरकर ९८२०९१७८४१**
**संपर्कासाठी अंतिम तारीख : १५ जानेवारी २०१९**

## गोविंद सर्वोत्तम वाघ

सादाशिवगड येथील वृत्तपत्रांचे वितरक गोविंद सर्वोत्तम वाघ यांचे अलीकडेच अल्पशा आजाराने वयाच्या ९० व्या वर्षी ३ ऑगस्ट २०१८ रोजी निधन झाले. गेले दोन-तीन महिने सोडले तर शेवटपर्यंत आपल्या वृत्तपत्राच्या स्टॉलचे ते कामकाज करत होते. त्यांच्या निधनाने सदाशिवगड आणि शेजारील भागात तीव्र शोककळा पसरली. दुसऱ्यांना मदत करण्याच्या स्वभावामुळे ते तेथील परिसरात फार लोकप्रिय होते. गरजू व्यक्तींना आर्थिक किंवा कोणत्याही प्रकारची मदत करण्यास ते सदैव तत्पर होते. गोविंद मामांच्या निधनाचे वृत्त कळताच पाचशेहून अधिक व्यक्तींनी त्यांच्या घरी अंतिम दर्शन घेतले. त्यांच्या प्रेतयात्रेला तर शेकडो लोक आले होते. हीच त्यांच्या लोकप्रियतेची पावती.

गोविंदमामा १९५३ साली मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. आपल्या भावांप्रमाणे नोकरीसाठी ते बंगलोरला किंवा मुंबईला जाऊ शकले असते. पण सदाशिवगडला आपल्या आईबरोबर राहून त्यांनी घरची शेती करायचे ठरवले. शेतीत सुधारणा करण्याची दृष्टी त्यांच्याजवळ होती. त्यामुळे जपानी पद्धतीची शेती करण्याकडे ते वळले तर त्यात आश्चर्य ते कसले. २००५ च्या सुमारास त्यांनी शेती करण्याचे थांबवले कारण शहरीकरण आणि उपलब्ध नसणारे कामकरी.

१९६० पर्यंत, सदाशिवगड आणि त्याच्या आजूबाजूच्या भागात वृत्तपत्रे मिळत नव्हती. १९६२ साली गोविदमामा हे 'फ्री प्रेस जर्नल', 'नवशक्ति' वृत्तपत्रांचे एजंट झाले. काही वर्षानंतर त्यांनी 'टाईम्स ऑफ इंडिया', 'महाराष्ट्र टाइम्स', 'इंडियन एक्स्प्रेस', 'लोकसत्ता', 'हिदु', 'नवाकाळ', 'गोमंतक', 'गोवा टाइम्स' इत्यादी १५ पेक्षा जास्त वृत्तपत्रांची एजन्सी घेतली. बरीच वर्षे गोविंदमामा एकटेच सायकलवरुन कारवारपासून गोव्याच्या हद्दीपर्यंत वृत्तपत्र पोहोचवीत होते. वृत्तपत्र पोहोचवणाऱ्या काही मुलांना त्यांनी नोकरीला ठेवले. आपले शिक्षण पूर्ण केल्यानंतर मंगेश आणि प्रसाद हे त्यांचे दोन मुलगे या व्यवसायात आले. आज वाघांची वृत्तपत्र एजन्सी 'सी बर्ड नेव्ही कॉलनी' पासून ते गोवा सरहद्द कद्रा मल्लापूर, कुण्णीपेठ, टाऊनशिपपर्यंत पसरली आहे. कारवार तालुक्यातील इतर गावातही ही एजन्सी वृत्तपत्र पोहोचवते. एजन्सीच्या व्यवसायाने गोविंदमामाचे नाव कारवार ते कद्रा व कुण्णीपेठपर्यंत झाले. या परिसरातील लोकांना वृत्तपत्र वाचनाची गोडी लावण्याचे काम त्यांनी केले. हे त्यांचे एक मोठे शैक्षणिक व सामाजिक कार्य म्हणावे लागेल.

गोविंदमामा हे एक उत्तम फुटबॉलपटू होते. शाळेच्या फुटबॉल टीमचे ते कप्तान होते. आंतर शालेय फुटबॉलचे सामने होत. त्यातील अंतिम सामन्यात 'हिंदु हायस्कूल' ला पराजित करुन आपल्या शाळेला त्यांनी ट्रॉफी जिंकून दिली. ते पट्टीचे पोहणारे होते एक दिवस १०-१२

वर्षाची एक मुलगी विहिरीवर पाणी भरत असताना विहिरीत पडली. तिची आई आणि इतरही मदतीसाठी मोठमोठ्याने हाका मारत होते. पण कुणीही तिला वाचवण्यासाठी विहिरीत उडी मारली नाही. गाविंदमामांनी चाललेला आरडा ओरडा ऐकला आणि धाव घेऊन विहिरीत उडी मारुन मुलीला वाचवले.

सदाशिवगडला आमच्या ज्ञातीतील काही वयस्कर स्त्रिया एकट्या राहायच्या. आपलं गाव सोडून मुलांकडे त्यांना राहायचे नव्हते. आपल्या मृत्यूनंतर आपलं काय होईल याची त्यांनी काळजी वाटायची. आपली चिंता त्या गोविंदमामांना बोलून दाखवत; आम्हाला विसरु नको म्हणून सांगत. त्यावर गोविंदमामा त्यांना मुळीच काळजी करु नका म्हणून आश्वासन देत. जिवंतपणी, तसेच तुमच्या मृत्यूनंतरही काळजी घेईन असं मनापासून सांगत. ते त्यांना दिलासा देत.

गोविंदमामा आणि डॉ. कृष्णा वाघांचा कंपाऊंडर काशण्णा मृतव्यक्तींचे अंत्यसंस्कार करायचे. काशण्णा १९७५ मध्ये वारल्यानंतर गोविंदमामा इतरांच्या मदतीने अंत्यसंस्काराचे कार्य करीत. गोविंदमामा आणि त्यांची पत्नी इंदिरा (कुसूम) या दोघांनी बऱ्याच आजारी वृध्द स्त्रियांची त्यांच्या मृत्यूपर्यंत सेवा सुश्रूशा केली.

आपल्या शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या सांपत्तिक परिस्थितीची त्यांना जाणीव होती. त्यांच्यापैकी कुणाच्याही आजारपणात मदत करायला सर्वात प्रथम ते हजर असत. त्यांच्या कुटुंबातील कुणाचा मृत्यू झाला तर त्याच्या अंत्यसंस्काराचा खर्च गोविंदमामा स्वत: करत.

शालेय शिक्षण घेण्यासाठी मी सदाशिवगडला आलो आणि गोविंदमामा व त्यांची आई 'बाय' त्यांच्या बरोबर तीन वर्षे राहिलो. दोन वर्षांनी गोविंदमामांचे इंदिराबरोबर लग्न झाले. तेव्हा मी मॅट्रिकच्या वर्गात होतो. सगळे जण मला गोविंदमामांच्या भावासारखाा वागवीत. माझ्या जीवनातील हा एक सुखाचा काळ होता.

माझे सदाशिवगडमधील शिक्षण संपल्यानंतर माझे दोन लहान भाऊ शिकायला गोविंदमामाच्या घरी राहू लागले. पण त्यांच्याशिवाय शिकायला आलेले आणखी चार विद्यार्थीही त्यांच्या घरी राहत होते. त्यांचे घर म्हणजे जणू लहान वसतीगृह होते. मंगेश आणि प्रसाद या दोन मुलांशिवाय गोविंद यांना उषा मुलगी आहे. त्यांचे घर हे मुलाबाळांनी भरलेले आहे.

वडिलांप्रमाणे गोविंदमामाचा माझ्यावर फार मोठा प्रभाव होता. त्यांचे व्यक्तिमत्त्व अविस्मरणीय आहे.

**प्रा. मंगेश मर्तोबा तेलंग, दादर**
**(९८३३२५८१२३)**

## निधन

| | | |
|---|---|---|
| प्रेमा गणपत आरस | (अंकोला) | जोगेश्वरी |
| गजानन (अरुण) नारायण ब्रह्मे | (सदाशिवगड) | माहीम |
| महेश वसंत देसाई | (व्हंडक्कल) | टिटवाला |
| दुर्गानंद वामन गायतोंडे | (हळगे) | पुणे |
| मोहिनी (इंदू) सुरेन्द्र कुलकर्णी | (हळगे) | माहीम |
| इंदूमती त्रिंबक कुलकर्णी | (किन्नर) | ठाणे |
| भास्कर मंगेश कुलकर्णी | (अवर्सा) | पारले |
| मीरा श्रीपाद कुलकर्णी | (हळगे) | हुबळी |
| गजानन भिकोबा मिटबंदर | (अंकोला) | ठाणे |
| विमल वसंत (मधुकर) मुझुमदार | (अंकोला) | बांद्रे |
| नारायण मर्तोबा मुझुमदार | (अंकोला) | अंधेरी |
| दिलीप गजानन मुझुमदार | (अंकोला) | ठाणे |
| सुधा श्रीपाद मंकीकर<br>(पूर्वाश्रमीच्या सुधा यशवंत वर्टी) | (बाड) | पुणे |
| सदानंद यशवंत नाडकर्णी | (सांवरपै) | पुणे |
| इंदू मुकुंद नाडकर्णी | (अगळी) | कारवार |
| स्नेहलता गजानन (किशोर) नाडकर्णी | (अंकोला) | कांदिवली |
| स्नेहलता अनंत नेत्रावळी | (अंकोला) | अंधेरी |
| लक्ष्मीबाई (इंदिरा) वामन पावशे | (बाड) | पारले |
| हरीहर कृष्णराव रेगे | (कवळे) | पुणे |
| प्रभाकर शंकर साखरदांडे | (सुपा) | पुणे |
| सदानंद शिवराम संजगिरी | (गांवगेरी) | ग्रांटरोड |
| हर्षल आत्माराम वाघ | (सदाशिवगड) | दादर |
| गोविंद सर्वोत्तम वाघ | (सदाशिवगड) | सदाशिवगड |
| विजया (कुंदा) विश्वनाथ वागळे | (माजाळी) | दादर |
| शंकर मारुती वागळे | (बाड) | चुनाभट्टी |
| लक्ष्मीबाई विठ्ठल वागळे | (माजाळी) | बोरीवली |
| मीरा गणपत वागळे | (माजाळी) | वाशी |
| शशिकला यशवंत वर्टी | (सदाशिवगड) | गोरेगांव |

EXPLORE WILDLIFE SAFARIS IN ANY PART OF THE WORLD WITH ...

# NILKANTH WILDLIFE SAFARIS





**Enjoy exploring various ways to learn about conservation and importance of wildlife by experiencing the beauty of it.**

**We undertake :**

1. Tailormade wildlife safaris in any part of the world for groups.
2. Educational and research nature trails and wildlife camps for schools, colleges and wildlife researchers.
3. Corporate management training programmmes and meetings in the well-known wildlife sanctuaries.
4. Nature club membership for students offered.

**Opportunity to participate in International Wildlife Projects for school students from III to X std.**

**For details contact - Dr. Mahesh N. Sanzgiri**

**Tel. : 022 26195323 / 9892157914**

**Website : www.nilkanthwildlifesafaris. com**

**Email : mnsanzgiri@hotmail.com**

# MJ DYNAMIC MANAGEMENT SERVICES

**(LATE SHRI NARAYAN AND SHRIMATI LAXMIBAI SANZGIRI GROUP)**

We undertake following services :

**Consultant for :**

1. Admission to foreign universities in any field and any country.
2. Student and family counseling.
3. All pharma formalities like cGMP, WHO, USFDA, etc.
4. ISO 9000, 14000, 20000, 22000, 27000, 45000 and 50000.
5. OHSAS 18000.
6. Green management.

We undertake all types of Management and technical training in the field of HRD, Marketing, Material management, Communications and Pharma.

Technical training in the field of Instrumentation, R&D, Laboratory techniques, Engineering, projects and maintenance.

**Expert in all types of Event Management**

**For details contact : Dr. Mahesh N. Sanzgiri**

**Tel. : 022 - 26195323 / +91 9892157914**

**Email : mnsanzgiri@hotmail.com**

## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

**(मागील अंकानंतर)**

**उल्लेखनीय देणग्या**

### श्री. बाळकृष्ण व श्रीमती कुमुद गायतोंडे यांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीला साडेसात लाख रुपयांची देणगी

ठाणे येथे राहणारे श्री. बाळकृष्ण (माधव) पुतुराव गायतोंडे हे असेसीमध्ये सिव्हील इंजीनिअर म्हणून कामाला होते. त्यांचे २००६ साली निधन झाले. त्यांच्या पत्नी श्रीमती कुमुद यांचे यंदाच निधन झाले. त्यानिमित्त उभयतांच्या स्मरणार्थ त्यांचे दोन पुत्र सर्वश्री श्रीकांत व सुनील व कन्या सौ. कांचन अनिल राजाध्यक्ष यांनी एज्युकेशन सोसायटीला प्रत्येकी अडीच लाख याप्रमाणे एकूण साडेसात लाख रुपयांची देणगी दिली आहे.

### श्रीमती स्मिता (दुर्गी) बोरकर यांजकडून एक लाख पाच हजार रुपयांची देणगी

सरस्वती बाग, जोगेश्वरी येथील, गेल्या पिढीतील एक कर्ते पुरुष श्री. दिनकर घनश्याम गायतोंडे हे किलीक इंडस्ट्रीस या मोठया उद्योगसमुहात अकौंटस मॅनेजर म्हणून कामाला होते. त्यांची कन्या स्मिता (दुर्गी) सत्येन्द्र बोरकर यांनी अलीकडेच समाजसेवानिधीसाठी एक लाख पाच हजार रुपयांची देणगी दिली आहे. त्याचा तपशील देणग्यांच्या यादीत (क्र. १०) मध्ये दिला आहे.

### श्रीमती निर्मला कसबेकर यांच्या स्मरणार्थ एक लाख रुपयांची देणगी

मुंबईचे माजी पोलीस कमिशनर श्री. मधुसूदन शामराव कसबेकर हे महासंचालक या अत्युच्च पदावरुन निवृत्त झाले होते. त्यांच्या पत्नी श्रीमती निर्मला कसबेकर यांचे अलीकडेच जुलै महिन्यात दु:खद निधन झाले. त्यांच्याच इच्छेनुसार त्यांच्या कन्या डॉ. मीना राम प्रभू व पुत्र श्री. उमेश यांनी संघाच्या समाज सेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिली आहे.

### सौ. विद्या व श्री. विनोद वागळे यांजकडून ऐंशी हजार रुपयांची देणगी

माहीम येथे राहणारे श्री. यशवंत नारायण वागळे हे ९० वर्षापूर्वी बालवयांत मुंबई येथे दाखल झाल्यावर त्यांनी इतरांप्रमाणे चाकोरीबध्द नोकरीचा पर्याय न स्वीकारता स्वत:चा स्वतंत्र व्यवसाय सुरु केला. त्यांनी फोर्टमध्ये मेट्रोपोलिटन स्टेशनर्स हे दुकान थाटले ते वर्णाने गोरे 'पिट्ट' होते म्हणून 'पिटया' वागळे म्हणूनच ते परिचित होते. गांवाहून कोणीही तरुण मुंबईत आला की सुरुवातीला पिटयामामाकडे आसरा घ्यायचा. त्यांचे घर म्हणजे एक वसतीगृहच होते त्यांच्या प्रचंड संपर्कामुळे मुलामुलींमध्ये सोयरीक जुळविण्यांत ज्ञातिबांधवांना त्यांचे फार साहाय्य होई. त्यांच्या पत्नी माहेरच्या गोव्यातल्या त्यापण साच्छील होत्या. गोवा मुक्ती संग्रामातील सत्याग्रहींना दुर्गाबाईचे घर म्हणजे एक हक्काचा थांबा असे.

पिटयामामांचे १९८५ साली निधन झाले तर दुर्गाबाई त्यापूर्वीच निवर्तल्या होत्या पिटयामामांचा व्यवसाय आता त्यांचे चिरंजीव श्री. विनोद वागळे हे बघतात. त्यांनी आपली पत्नी सौ. विद्या यांच्या समवेत आई वडिलांच्या स्मरणार्थ नुकतीच ऐंशी हजार रुपयांची देणगी दिली आहे. त्यांतील प्रत्येकी चाळीस हजार रुपये समाजसेवेसाठी व एज्युकेशन सोसायटीसाठी आहेत.

## श्रीमती सुनंदा कसबेकर यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ साठ हजार रुपयांची देणगी

बहुतेकांच्या परिचयाचे निष्णात प्रशासक पी.डी. कसबेकर हे महाराष्ट्र राज्याचे सर्वात अधिक प्रतिष्ठित समजले जाणारे चीफ सेक्रेटरी या पदावर होते. ते ज्ञातीच्या कार्यात विशेष रस घेत असत. त्यांच्या इच्छापत्रानुसारच संघाला व एज्युकेशन सोसायटीला त्यांच्या निधनापश्चात् प्रत्येकी १,१७,००० हजार रुपयांच्या देणग्या मिळाल्या होत्या. त्यांचे सुपुत्र डॉ. दुर्गादास कसबेकर हे हैदराबाद येथील सेंटर फॉर सेल्युलर अँड मोलेक्युलर बायॉलॉजी या संस्थेत संशोधन करतात. Genetics या विषयातील आंतरराष्ट्रीय स्तरावरील ते एक ख्यातनाम तज्ज्ञ आहेत. त्यांच्या उच्च दर्जाच्या संशोधनाची दखल घेऊन बंगळूर येथील इंडियन ॲकेडमी ऑफ सायन्स या जगद्विख्यात संशोधन संस्थेने डॉ. दुर्गादास यांची फेलो म्हणून निवड केली आहे. डॉ. दुर्गादास यांनी आई श्रीमती सुनंदा यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ साठ हजार रुपयांची देणगी दिली आहे. त्यातील तीस हजार रुपये समाजसेवानिधीसाठी आहेत व ऊर्वरीत तीस हजार रुपये एज्युकेशन सोसायटीसाठी आहेत.

## श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त वृध्दसेवानिधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी

माहीम येथे राहणारे श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी यांचा १५ फ्रेब्रुवारी २०१८ हा जन्मशताब्दी दिन. ते ज्ञातीच्या संदर्भातील विषयावर विशेष रस घेत असत. त्यांनी स्वत: व त्यांच्या आप्तेष्टांनी त्यांच्या नावे अनेक देणग्या दिल्या आहेत. अलीकडेच त्यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्यांचा नातू श्री. कवीश दुर्गानंद (मच्छिंद्र) कसबेकर, नातसून श्रीमती अरुंधती व पणती कु. रिया यांनी दिवंगत कुलकर्णी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वृध्दसेवानिधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

## फेणे कुटुंबीयांकडून फेणे मास्तर निगडीत कारवार परिसरांतील चार शाळांना एकूण साडेपंधरा लाख रुपयांची देणगी - फेणे मास्तरांचे कायमस्वरुपी स्मारक

सदाशिवगड हायस्कूल व हिंदू हायस्कूल येथील अनुक्रमे श्री. दिनानाथ फेणे व श्री रामदास फेणे, दोघेही फेणे मास्तर, हे तेथील फार लोकप्रिय शिक्षक होते. उभय शाळांमध्ये

डझनभर फेणे कुटुंबीयांचे शालेय शिक्षण झाले आहे. त्यांचे वडील श्री. नरहर शाबाजी फेणे हे अंकोला येथील जयहिंद हायस्कूल मध्ये १९०२ ते १९०७ दरम्यान मुख्याध्यापक होते श्री. रामदास फेणे हे हिंदू हायस्कूल सोडून काणकोण जवळील माशे या गांवातील निराकार विद्यालयात मुख्याध्यापक म्हणून काही वर्षे कार्यरत होते. तेथेही त्यांनी नावलौकिक मिळविला. नोव्हेंबर २००२ मध्ये त्यांना प्रशासनातर्फे आदर्श शिक्षक म्हणून पुरस्कार मिळाला होता. त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती रेखा फेणे यासुध्दा गोव्यातल्या एक ख्यातनाम शिक्षिका होत्या. दिनुमामांच्या स्नुषा श्रीमती जयश्री शशिकांत फेणे यांनीही आसाम मध्ये एका शाळेंत मुख्याध्यापिकेचे पद भुषविले आहे. दिनुमामाची नातसून सौ. अनुपमा रणजित फेणे ही सुध्दा अमेरिकेत प्रोफेसर म्हणून काम करते. नरहर फेणे यांचा पणतू अनिरुध्द भारत फेणे याचा पारले येथे 'फेणे एज्युकेशन' या नांवाचा कोचिंग क्लास आहे थोडक्यात फेणे कुटुंबीयापैकी बऱ्याच व्यक्ती अध्यापन क्षेत्राशी निगडीत होत्या किंवा आहेत.

उभय फेणे मास्तरांचे धाकटे बंधू श्री. वसंत नरहर फेणे एक जेष्ठ साहित्यीक होते. लघुकथा संग्रह व कादंबऱ्या मिळून त्यांची सुमारे तीस पुस्तके प्रसिध्द झाली आहेत. वयाच्या ९० व्या वर्षी लिहिलेली ६०० पृष्ठांची 'कारवारी माती' हे त्यांची शेवटची कादंबरी. त्यांना साहित्याबद्दल अनेक पुरस्कार मिळाले होते. त्यांचे अलीकडेच मार्च महिन्यांत निधन झाले. त्याचे सुसंस्कृत व कर्तबगार चिरंजीव श्री. श्रीहर्ष (श्री) फेणे यांनी पुढाकार घेऊन आजोबा नरहर फेणे व काका दिनानाथ व रामदास फेणे मास्तर यांचे कायम स्वरुपी स्मारक करण्याचा संकल्प केला. त्यानुसार श्री यांनी वडिलांच्या उत्पन्नाच्या शिलकीतून आप्तेष्टांनी दिलेल्या देणग्यांची भर घालून साडेपंधरा लाख रुपयांचा निधी गोळा केला.

फेणे कुटुंबीय पूर्वी अनंत चतुर्दशीची पूजा करीत असत त्यानिमित्त सर्व दायाद व नातेवाईक एकत्र जमत असत त्यामुळे सौहार्दाचे नाते बळकट होण्यास साहाय्य होत असे. कालांतराने ही प्रथा बंद झाली. तरीही त्याच तिथीचे औचित्य साधून श्री यांनी फेणे आप्तेष्टांची कारवार सहल आयोजित केली. रविवार २३ सप्टेंबर अनंतचतुर्दशीच्या शुभदिनी सकाळी हिंदू हायस्कूलच्या व्यवस्थापक मंडळाचे सभासद, शिक्षक वर्ग व काही हितचिंतक यांच्या उपस्थितीत शाळेच्या हस्तकला विभागाच्या बाहेर 'श्री नरहर शाबाजी फणे व श्रीमती रमाबाई यांच्या स्मरणार्थ' या अर्थाची प्लेक बसविण्यांत आली होती त्याचे अनावरण करण्यांत आले व वर्गाच्या दरवाजातील रिबन कापून वर्गाचे उद्घाटन करण्यांत आले. त्यानंतर शाळेच्या सभागृहात एका हृद्य समारंभात फेणेंतर्फे संस्थेचे अध्यक्ष श्री. श्रीधर कामत यांना पांच लाख रुपयांची देणगी देण्यांत आली.

नंतर फेणे पलटण यांनी अंकोला येथे कूच केले. नरहर फेणे मुख्याध्यापक असलेल्या तेथील जयहिंद हायस्कूलमध्ये असाच एक घरगुती समारंभ झाला. त्यावेळी नरहर फेणे व

रमाबाई तसेच त्यांची मुले व स्नुषा व मुली व जावई यांची नांवे असलेली एक प्लेक संस्थेचे अध्यक्ष श्री पद्मनाभ प्रभू यांना ती योग्य ठिकाणी लावण्यासाठी देण्यांत आली व सोबत देणगी म्हणून पाच लाख रुपयाचा धनादेश देण्यांत आला.

अनंत चतुर्दशीच्या आदल्या दिवशी सदाशिवगड हायस्कूलमध्ये एका वर्गाला दिनानाथ फेणे यांच्या स्मरणार्थ एक प्लेक बसविण्यांत आली होती त्याचे, अनावरण करण्यात आले. त्यानंतर झालेल्या एका सोहळयांत व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष श्री. गंगाधर भट यांना फेणे मास्तरांच्या स्मृती प्रीत्यर्थ पावणेतीन लाख रुपयांची देणगी देण्यात आली.

अनंत चतुर्दशीच्या दुसऱ्या दिवशी अशाच प्रकारचा घरगुती कार्यक्रम माशे येथील निराकार विद्यालयांत झाला. त्यावेळी शाळेला रामदास फेणे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ बनविलेली एक प्लेक व सोबत देणगी म्हणून पावणेतीन लाख रुपयांचा धनादेश देण्यांत आला.

**साठा उत्तरांची फेणे कहाणी,पांचा उत्तरी सुफळ संपूर्ण!**

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. मनोहर गोविंद बोरकर यांच्या स्मरणार्थ पुतण्या श्री. मिलिंद दिनकर बोरकर यांजकडून. | १,००१ |
| २. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या ८४ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून. | १,५०१ |
| ३. | श्रीमती इंदिराबाई व श्री. शंकर सदाशिव वागळे यांच्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. किशोर यांजकडून. | १,००१ |
| ४. | श्रीमती निर्मला मधुसूदन कसबेकर यांच्या स्मरणार्थ त्यांच्या इच्छेनुसार कन्या डॉ. मीना प्रभू व पुत्र श्री. उमेश यांजकडून. | १,००,००० |
| ५. | श्री. मधुकर काशिनाथ नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती शालन यांजकडून. | १,००१ |
| ६. | श्रीमती दुर्गाबाई व श्री. यशवंत नारायण वागळे यांच्या स्मरणार्थ स्नुषा श्रीमती विद्या व पुत्र श्री. विनोद यांजकडून. | ४०,००० |
| ७. | श्रीमती स्नेहलता (चंपू) व श्री. वासुदेव गजानन सबनीस यांच्या स्मरणार्थ व श्रीमती सविता किशोर सबनीस यांच्या स्मरणार्थ सविता सबनीस फाऊंडेशकडून. | १०,००० |
| ८. | श्री. मधुकर मारुती पै यांजकडून.० | १०,००० |
| ९. | आई वडिलांच्या स्मरणार्थ मुलाकडून | १०,००० |

| | | |
|---|---|---|
| १०. | श्रीमती स्मिता (दुर्गी) सत्येंद्र बोरकर यांजकडून. | |
| | खालील व्यक्तींच्या स्मरणार्थ. | |
| | श्री. दिनकर घनश्याम गायतोंडे (वडील) | ५०,००० |
| | श्रीमती पार्वती दिनकर गायतोंडे (आई) | २५,००० |
| | श्री. कमलाकर घनश्याम गायतोंडे (काका) | १०,००० |
| | श्रीमती शांता विनायक देसाई (बहीण) | १०,००० |
| | श्री. प्रमोद दिनकर गायतोंडे (भाऊ) | १०,००० |
| | | १,०५,००० |
| ११. | श्री. देवीदास पांडुरंग बोरकर यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ व श्रीमती शैला देवीदास बोरकर यांच्या ७६ व्या वाढदिवसा निमित्त कन्या श्रीमती सुनीता यांजकडून. | ५,००० |
| १२. | पूर्वजांच्या स्मरणार्थ पितृपक्षानिमित्त श्रीमती रेखा चंद्रशेखर धुमे यांजकडून | १,००० |
| १३. | श्रीमती सुनंदा प्रभाकर कसबेकर यांच्या स्मरणार्थ पुत्र डॉ. दुर्गादास यांजकडून | ३०,००० |
| १४. | श्रीमती सुनीता शशिकांत तिळवे यांच्या स्मरणार्थ मैत्रिणीकडून. | १,००१ |
| १५. | डॉ. रघुनंदन दत्तात्रय मुसुमदार यांजकडून. | १०,००० |
| १६. | पितरांच्या स्मरणार्थ पितृपक्षानिमित्त नाडकर्णी कुटुंबीयाकडून | ५,००१ |
| | भांडारकर कुटुंबीयांकडून | १,५०१ |
| १७. | श्रीमती उषा निशिकांत नाडकर्णी यांजकडून ७५ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी | ५,००० |
| १८. | श्रीमती मोहना व डॉ. दिगंबर भालचंद्र देसाई यांच्या स्मरणार्थ कन्या डॉ. पल्लवी शशांक तेलंग यांजकडून. | १०,००० |

## वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. दिगंबर रामराव नाडकर्णी यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी नातू श्री. अमित रोहिदास नायक यांजकडून. | २१,००० |
| २. | श्रीमती स्नेहलता गोविंद कसबेकर यांच्या ४ थ्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. विनय यांजकडून. | ३,००० |
| ३. | श्री. भालचंद्र रामराव वागळे यांच्या इच्छेनुसार बंधु श्री. जयवंत रामराव वागळे यांजकडून. | ५,००० |
| ४. | श्री. अनिल भालचंद्र तेलंग यांच्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. पराग यांजकडून. | २०,००० |
| ५. | श्रीमती उषा जयवंत वागळे यांच्या पहिल्या पुण्यतिथी निमित्त पती श्री. जयवंत रामराव वागळे यांजकडून. | ५,००० |
| ६. | श्रीमती काशीबाई महाबळेश्वर रामाणी यांच्या स्मरणार्थ भाची कडून. | १,००१ |

## वृध्दसेवा निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. भालचंद्र रामराव वागळे यांच्या स्मरणार्थ बहीण श्रीमती रमाबाई रमाकांत नाडकर्णी यांजकडून. | ५,००१ |
| २. | श्रीमती इंदिरा मंगेश नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ स्नुषा श्रीमती वंदना प्रमोद नाडकर्णी यांजकडून. | ५,००० |
| ३. | श्री. भालचंद्र रामराव वागळे यांच्या इच्छेनुसार बंधु श्री. जयवंत रामराव वागळे यांजकडून. | ५,००० |
| ४. | श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी यांच्या जन्मशताब्दी निमित्त नातू श्री. कवीश नातसून श्रीमती अरुंधती व पणती कुमारी रिया कसबेकर यांजकडून. | ५०,००० |
| ५. | श्रीमती उषा जयवंत वागळे यांच्या पहिल्या पुण्यतिर्थी निमित्त पती श्री. जयवंत रामराव वागळे यांजकडून. | ५,००० |
| ६. | श्रीमती मीरा व गोपाळ सर्वोत्तम तेलंग यांच्या पुण्यतिथीप्रसंगी पुत्र सर्वश्री मिलींद व निमीष यांजकडून. | ५,००१ |
| ७. | श्रीमती मालती व श्री. दिनकर वामन वर्टी यांच्या पुण्यतिथीप्रसंगी कन्या श्रीमती मीनल सतीश भुजले व रेखा मिलींद तेलंग यांजकडून. | ५,००१ |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती कमल विश्वंभर गायतोंडे यांच्या १२ व्या पुण्यतिथी निमित्त बंधु श्री. अरुणकुमार विश्वंभर गायतोंडे यांजकडून. | १०,००० |
| २. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या ८४ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून. | १,५०१ |
| ३. | श्रीमती दुर्गाबाई व श्री. यशवंत नारायण वागळे यांच्या स्मरणार्थ स्नुषा श्रीमती विद्या व पुत्र श्री. विनोद यांजकडून. | ४०,००० |
| ४. | श्रीमती कुमुद व श्री. बाळकृष्ण पुतुराव गायतोंडे यांच्या स्मरणार्थ | |
| | पुत्र श्री. श्रीकांत यांजकडून | २,५०,००० |
| | श्री. सुनील याजकडून व | २,५०,००० |
| | कन्या श्रीमती कांचन अनिल राजध्यक्ष यांजकडून | २,५०,००० |
| ५. | श्री. भालचंद्र रामराव वागळे यांच्या इच्छेनुसार बंधु जयवंत रामराव वागळे यांजकडून. | ५,००० |
| ६. | श्रीमती सुनंदा प्रभाकर कसबेकर यांच्या स्मरणार्थ पुत्र डॉ. दुर्गादास यांजकडून. | ३०,००० |

## ठाणे मंच देणगीदारांची यादी

| | | |
|---|---|---|
| १. | सौ. नूतन अजित गंडभीर अंधेरी | ५, ००० |

Regd. with registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80




हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.